# माणूस

शनिवार ४ मार्च १९७८
७५ पैसे



राजकीय फेरजुळणी
आता अपरिहार्य आहे.

थोडक्यात सांगायचे तर
मतदाराने साऱ्यांचीच
'गोची' केली आहे.

□ □

छोट्या पक्षांपैकी
मार्क्सवादी कम्युनिस्ट
धूर्त म्हटले पाहिजेत.

□ □

'कोंडी' तर फुटली !

# साप्ताहिक माणूस

वर्षं सतरावे-अंक चाळीस

४ मार्च १९७८

मूल्य पंचाहत्तर पैसे



संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

◻

वार्षिक वर्गणी ।

चाळीस रुपये

◻



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



◻

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले

◻

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव पेठ,

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

◻

दूरध्वनी : ४४३४५९

◻


# अवती - भवती

शरद कृष्णन्

## ◻ मतपेटी .. एक अजब अतर्क्य चमत्कार

लोकसभा निवडणुकांचे निकाल घोषित झाल्यावर तो एक अजब चमत्कार असल्याची प्रतिक्रिया वर्षभरापूर्वीच उमटली होती. आताच्या विधानसभा निवडणुकांच्या निकालांना मतपेटीने घडवून आणलेला एक अजब अतर्क्य चमत्कार असेच म्हणावे लागेल. निवडणुकांच्या निकालाबाबत राजकीय पंडित फारसे बोलत नव्हते. प्रत्येक पक्षाचे राजकीय नेते आपल्या विजयाची ग्वाही देत होते. राजकीय निरीक्षक वातावरण जनतानुकूल असल्याचे आणि निदान महाराष्ट्रात तरी जनता सरकार येणार असल्याचे सांगत होते. बारामतीची अमेथी आणि सांगलीची रायबरेली करण्याच्या घोषणा चालू होत्या. मतदार सर्व ऐकत होता, पहात होता. भरभरून त्याने जे मत पेटीत टाकले ते प्रकाशझोतात आल्यावर डोळे दिपून गेले आहेत. राजकीय पंडित दिङ्मूढ झाले आहेत. वातावरणावरून निकालाची दिशा ठरविणारे निरीक्षक लागलेल्या निकालावरून आपले संदर्भ दुरुस्त करून घेत आहेत. थोडक्यात सांगायचे तर मतदाराने साऱ्यांचीच गोची केली आहे. लोकसभा निवडणुकांचे निकालाच्या वेळी आश्चर्य वाटले.—अपूर्व वाटले तरी असे होऊ शकेल, असे वाटत तरी होते; परंतु चारही बाजूंनी प्रतिकूल अवस्थेत असलेल्या इंदिराजींनी आज जे यश मिळविले आहे त्याचे वर्णन 'अतर्क्य चमत्कार!' अशा शब्दातच करावे लागेल.

इंदिराजींची गाजलेली आणीबाणी—कारकीर्द घराघरात पोचली असताना, त्यांचे स्वतःचे सर्व प्रमुख साथीदार त्यांना सोडून गेले असताना आणि राजकीय बदनामीने त्यांची झोळी शिगोशीग भरली असताना मतांची बरसात करून मतदारांनी त्यांना जे नवे तेज आज प्राप्त करून दिले आहे त्याचा संदर्भ लक्षात घेतला तर बाईंची ही आक्रमक वाटचाल राजकीय फेरजुळणीचे क्रांतिकारी पर्व सुरू करणारी ठरणार आहे. बाईंचे हे झंझावती पुनरागमन काँग्रेसचे दरवाजे त्यांना सन्मानपूर्वक मोकळे करणारे ठरणार आहे. रेड्डी—चव्हाण काँग्रेस या काँग्रेस आयच्या झंझावती यशाने नेस्तनाबूत झाल्यासारखी आहे. चव्हाणांच्या गळमुळीत आणि पोचट राजकीय कारकीर्दीचा यापेक्षा वेगळा शेवट संभवत नव्हता. लोकसभेमधील काँग्रेसपक्षाची पुनर्रचना ही एक अपरिहार्य घटना आहे. साहेबांची विरोधी पक्षाच्या नेतेपदाची खुर्ची हादरली आहे. काँग्रेसमधील फाटाफुटीनंतर कुंपणावर बसलेले असंख्य खासदार आता तातडीने इंदिराबाईंच्या पाठी येऊन उभे राहतील. विधानसभा निवडणूक—निकालांनी बाईंना एवढी शक्ती प्राप्त करून दिली आहे की, त्या एखाद्या पोटनिवडणुकीतून लोकसभेत प्रवेश करण्यास मागेपुढे पहाणार नाहीत. जनता पक्षामधील मतभेद या निकालांमुळे वाढतील असे वाटत नाही. सत्तेची खुर्ची आणि बाईंचे दडपण या दोन्ही गोष्टी त्यांना एकत्र ठेवतील. जनता सरकारला आता खऱ्या अर्थाने प्रखर विरोधाला तोंड द्यावे लागेल. आज लोकसभेत असलेला मुळमुळीत बोटचेपा विरोधी पक्ष पार मागे कोपऱ्यात जाऊन बसेल आणि आज सत्तेवर असलेले जनता पक्षाचे नेते विरोधी पक्षात असताना जसे आक्रमक होते, तसे आक्रमक धोरण इंदिरा काँग्रेसकडून स्वीकारले जाईल. बाईंच्या या झंझावती यशानंतरही त्यांच्या बाबतची चौकशी आणि शहा आयोग आणि अन्य विविध आयोगांचे कामकाज अर्थातच

चालू राहील; पण बाईंच्या लोकप्रियतेच्या प्रचंड लाटेने निर्माण झालेले वातावरण या चौकशीप्रकरणांचे गांभीर्य एकदम पातळ करून टाकील. लोकांच्या इच्छा प्रमाण मानून आधीच्या सरकारने चालविलेला जॉर्जवरील गंभीर खटला जर काढून घेता येतो तर बाईंच्या लोकप्रियतेचा मिळालेला ताजा कौल या चौकशी–प्रकरणामधील गांभीर्य जरूर बोथट करू शकतो हे नाकारता येणार नाही. मला एक सांगा की, चार दिवसांखाली जरी कुणी '–बाई आंध्र–कर्नाटक खिशात टाकून महाराष्ट्रात ६२ जागा घेतील' असे सांगता तर...तुम्हीही त्याला हसण्यावारी नेले असतेत. इंदिराजी हे असे प्रचंड यश मिळवतील असे कोणालाही वाटले नव्हते; पण प्रत्यक्षात हा चमत्कार झाला. बुद्धी, भावना, विचार, तर्क यांच्या चौकटीत बाईंचे यश जोखता येणार नाही, की लोकसभा निवडणुकांच्या वेळी शहाणपणाने मतदान करणाऱ्या मतदाराला मूर्ख ठरविता येणार नाही. बाई कर्नाटकात किंवा आंध्रात सत्तेवर आल्या म्हणून दक्षिण–उत्तर असा छेद देऊनही चालणार नाही. सर्व पापांसह येणाऱ्या या बाईंसाठी जर दक्षिण गालिचे अंथरते, जर आणीबाणीची धार बोथट झाली आणि जनता पक्ष आर्थिक आघाडीवर भरघोस काम करू शकला नाही तर उत्तरेमधील कडवा नकार टक्कर देऊन फोडता येईल एवढी शक्ती आज या बाईंनी जमा केली आहे. बाई पुन्हा कधीही सत्तेवर येणार नाहीत हे कालपरवापर्यंत बिनधास्त वाटणारे विधान तपासून पहाण्याची वेळ खचित आली आहे. इंदिराजी वैयक्तिक स्वार्थासाठी काही गैरकृत्य करू शकतात यावर लोकांचा विश्वास नाही, असा अर्थ जर या मतदानातून कोणी काढला तर असे विधान करणाराला मूर्ख ठरविता येणार नाही. बाई जोपर्यंत उभ्या आहेत तोपर्यंत त्या गणिती पद्धतीने जिचा कधीही अर्थ लावता येणार नाही अशी एक प्रचंड शक्ती आहे एवढे नवीन चिन्ह, नवीन पक्ष घेऊन उभ्या असलेल्या इंदिराजींनी जरूर सिद्ध केले आहे. यशवंतराव चव्हाणांच्या राजकारणाची सांगता या निकालाने केली आहे. लोकसभेमधील त्यांच्या अस्तित्वाचा उरलासुरला अर्थच संपून गेला आहे. ब्रह्मानंदजींची अवस्था त्यांच्यापेक्षा दारुण आहे. वसंतराव नाईक विदर्भातून उखडले गेले आहेत. उतारवयात उभ्या असलेल्या वसंतराव नाइकांना पाच वर्षांच्या खासदारकीपुढे भवितव्य दिसत नाही. केन्द्रात सत्तेवर असून उत्तरेतील पक्ष अशीच जनता पक्षाची प्रतिमा तयार झाली आहे.

निवडणुक–निकालांचा राज्यवार विचार करायचा झाला तर आंध्र–कर्नाटकबाबत बोलण्याचे प्रयोजनच नाही. बाईंचा शब्द हाच तेथील राजकारणामध्ये पक्षीय आणि शासकीय धोरणामध्ये अखेरचा शब्द ठरला आहे. आसाममध्ये जनता पक्षाची सरशी होईल असे दिसते आहे. मेघालयामध्ये सावळागोंधळ आहे. महाराष्ट्र हे एकच राज्य असे होते की, जिथे निवडणूकपूर्व हालचाली अधिक सुबुद्धपणे केल्या गेल्या असत्या तर कदाचित जनता पक्षाचे आणि मित्रपक्षांचे स्थिरसरकार सत्तेवर येऊ शकले असते. महाराष्ट्राने आजवर स्थिर शासनासाठी मतदान केले आहे. राजकीय अस्थिरतेची पहिली चुणुक महाराष्ट्राला आता अनुभवयास मिळणार आहे. धुक्यात हरवलेल्या या वाटेतून सत्तास्थानाची मंजिल गाठणे वाटते तेवढे सोपे नाही. जनतालाही नाही आणि काँग्रेसलाही नाही. लोकशाही संकेताप्रमाणे नवीन विधानसभेमधील सगळ्यात मोठा पक्ष म्हणून जनता पक्षाला सरकार बनविण्याचा अग्रमान मिळेल; परंतु ही तारेवरची कसरत करण्याची जबाबदारी जनता पक्षाला दीर्घ काल पेलणे अवघड आहे. हा मजकूर लिहिताना महाराष्ट्र विधानसभेच्या २८८ पैकी २८४ जागांचे निकाल जाहीर झाले आहेत. घोषित निकालांप्रमाणे जनता पक्षाला ९७ जागा मिळाल्या आहेत. समजा, उरलेल्या दोन्ही जागा या पक्षाला मिळाल्या तरी जनता पक्षाची संख्या शंभरावर जात नाही. उजव्या हाताने ज्यांच्याबरोबर दोस्ती केली आणि डाव्या हाताने ज्यांच्यावर हत्यार चालविले तो जनताचा मित्रपक्ष शे. का. पक्ष केवळ १३ जागा घेऊन विधानसभेत आला आहे. या तेरा, मार्क्सवाद्यांच्या ९ आणि ३३ अन्य उमेदवारांपैकी पाच–सात दोस्त मंडळी जमेस धरली तरी आवश्यक ते बहुमत जनता पक्षाला प्राप्त होत नाही. मंत्रिमंडळ बनविण्यासाठी वैयक्तिक महत्त्वाकांक्षेने पछाडलेले काही नेते अगदी आसुसले असतील, तरीही मंत्रिमंडळ बनविण्याचा हा 'जळता निखारा' हातात घ्यावा की नाही याचा जनता पक्षाने अत्यंत काळजीपूर्वक विचार करणे आवश्यक आहे. राजकीय चाल म्हणून काँग्रेसवाल्यांना सत्तेची वाट मोकळी करून देऊन त्यांना कोंडीत पकडणे कदाचित धूर्तपणाचे ठरणार आहे. अर्थात मंत्रिमंडळ बनविणे योग्य की काँग्रेससाठी वाट मोकळी सोडणे योग्य याचा विचार करण्याचा विवेक जनता पक्षाने दाखविला तर हा प्रश्न संभवतो. याबाबत मतभेद झाले तर ते तीव्र होण्यापूर्वी सत्ता स्वीकारून ती राबविणे उत्तम. आज जागांची विभागणी अशी काही विचित्र झाली आहे की, कोणतेही सरकार सत्तेवर आले तरी त्याला पाच वर्षे राज्य करणे जमणार नाही. केरळमधील अच्युत मेनन सरकारने कडबोळे तयार करून असे राज्य केले होते हे खरे; तथापि त्यांच्या योग्यतेचा नेता जनता पक्षाजवळही नाही आणि काँग्रेसजवळही नाही. विधानसभेचे राजकीय व्यासपीठ ही जर आमदार खरेदी–विक्रीची घाऊक बाजारपेठ बनवायची नसेल तर वर्षा–दोन वर्षांत पुन्हा निवडणुका हा सगळ्यात सुसंगत आणि न टाळता येण्यासारखा परिणाम वाटतो.

मतदानावर दृष्टिक्षेप टाकला तर पुणे, मुंबई, कोकण यांनी जनता पक्षावर पूर्ण विश्वास व्यक्त केला आहे. साताऱ्यात जनता पक्षाने नोंदलेला विजय महत्त्वपूर्णच मानावा लागेल. वाळव्यामधील निकाल पाहिला तर शे. का. पक्षाने जर अवास्तव दावे केले नसते तर केवळ हाच निकाल नव्हे तर पक्षवार विभागणीचे सारे चित्रच पालटले असते हे नाकारता येणार नाही. विदर्भामध्ये इंदिरा-लाट होती याची सगळ्यांनाच जाणीव होती. तथापि ती लाट एखादा अपवाद वगळता साऱ्याच्या साऱ्या जागा इंदिराजींना देऊन जाईल असे मात्र वाटले नव्हते. जिचे नावही माहीत नव्हते अशी शालुताई वुद्धिवंत नावाची बाई इंदिरा काँग्रेसची उमेदवार म्हणून पुण्यातील पर्वतीमध्ये येते आणि सोळा हजार मते घेऊन जाते किंवा बोपोडीमध्ये इंदिराबाईंचे नाव घेत आलेला शशिकान्त कदम अठरा हजार मते घेतो या गोष्टी दलितवर्ग जेथे मोठ्या संख्येने आहे तिथे बाई किती मजबूत उभ्या आहेत याची कल्पना आणून देणारा

आहे. जनता पक्षाच्या मातब्बर बंडखोर उमेदवारांनी प्रज्ञावंतांचा पाठिंबा मिळविला तरी त्यांची डाळ मुंबईत शिजू शकली नाही. याउलट पक्षबदल करूनही बाळासाहेब मतवर्षावात न्हाऊन निघाले! पन्नालाल आणि राजारामबापू यांच्या पराभवाची बोच जनता पक्षाच्या जिव्हारी लागणारी आहे. काँग्रेसच्या पराभूतांच्या यादीत फार मोठे नाव नाही. अनेक मंत्री गडगडले हे खरे; परंतु हे असे होईलच अशी अपेक्षा असल्याने त्यात धक्कादायक काही वाटले नाही. काँग्रेसला विदर्भात बसलेला मार बोचरा आहे, तर अकलूजच्या शंकररावांना चंद्रशेखरवरील दगडांचा मारा महागात पडला आहे. ज्यांना काँग्रेसचे राजकारण करायचे आहे त्यांना आता काँग्रेस पुनर्रचनेला तोंड द्यावे लागेल. काँग्रेसचे आणि इंदिरा काँग्रेसचे इंदिरा वर्चस्वाखालील पुनर्घटन सुरू झाले की, दोन-दोनशे पौंडांचे आमदार पाण्यात टाकलेल्या साखरी खड्याप्रमाणे विरघळू लागतील. ज्यांना काँग्रेसचे राजकारण नको आहे, त्यांच्यासाठी जनता दार उघडून बसली आहेच. काँग्रेस काय किंवा जनता काय राज्य करायचे असले तर आमदार गोळा करण्यासाठी दोघांनाही बाहेर पडावेच लागणार आहे. पैसा आणि सत्तास्थानांची आमिषे यांची खैरात होणार आहे.

छोटया पक्षांपैकी मार्क्सवादी कम्युनिस्ट खरोखरच धूर्त म्हटले पाहिजेत. जनता पक्षाशी समझौता करून त्यांनी ११ जागा लढविल्या आणि त्यापैकी नऊ जिंकल्या. या दोस्तांनी केवळ बाहेरून पाठिंबा देऊन भागण्यासारखे नाही. जनता पक्षाने सरकार बनवायचे ठरविले तर त्यांना मार्क्सवाद्यांना आत घ्यावेच लागेल आणि केवळ बाहेर राहून पाठिंबा देण्याची घोषणा मार्क्सवाद्यांना निकाली काढावी लागेल.

शिवसेनेचे हसे होईल असे वाटले होते; परंतु ती इतकी फसेल असा मात्र अंदाज नव्हता! बाळासाहेब ठाकरे ज्या उलटसुलट कोलांटया उडया मारतात त्याची ही परिणती आहे. रिपब्लिकन पक्ष कोणाच्याही पाठी जाऊन उभा राहिला तर त्याला जे मिळेल तेवढे यश मिळाले आहे. एकजिनसी पक्ष खंडित झाल्याने विविध नेत्यांच्या नावांनी ओळखल्या जाणाऱ्या या पक्षामधील विविध गटांना संख्येने प्रचंड असलेल्या दलित समाजाच्या राजकीय सामर्थ्याची शक्ती उभी करता आली नाही. येणार नाही हेच खरे!

या विधानसभा निवडणुकांनी महाराष्ट्राचे कालचे भाग्यविधाते सत्ताभ्रष्ट केलेच; पण केंद्रामधील विरोधीपक्षाच्या पुनर्रचनेचा रेटा दिला. साहेबांच्या अनिर्बंध सत्तेचे आकुंचन झालेच होते. आता त्याची दुर्दैवी अखेरही झाली! या निवडणुकीत जे मतदान झाले त्यामुळे शेकापचा फटाका अगदीच फुसका निघाला आहे हेही स्पष्ट झाले. या मंथनातून जे काही चांगले-वाईट निघायचे आहे ते निघेलच; परंतु महाराष्ट्राच्या राजकारणाची काँग्रेस पक्षीय कोंडी या निवडणूक-निकालांनी पूर्णपणे फोडली आणि पक्षीय आणि सत्ताराजकारण आज तरी अनिश्चित अवस्थेमध्ये नेऊन ठेवले हे नमूद करावे लागेल. ◘

## मथाई यांच्या पुस्तकावर शारदामाता यांचे टीकास्त्र

श्री. मथाई यांचे नेहरू जमान्यातील आठवणी सांगणारे पुस्तक अनेक कारणांनी गाजले तरी त्या पुस्तकाबद्दल अनेक मातब्बर मंडळींनी नाराजी व्यक्त केली. लोकसभेमध्येही या पुस्तकाबद्दल प्रतिकूल प्रतिक्रिया उमटली. याच पुस्तकामध्ये– शारदामाता नावाच्या बाईपासून नेहरूंना एक मुलगा झाल्याची खळबळजनक हकीगत आलेली आहे. धार्मिक कार्य आणि ईशचिंतन यामध्ये गुंतलेल्या शारदामाता अजून हयात असून त्यांनी जवाहरलालजींच्या मुलाला आपण जन्म दिल्याच्या आरोपाचा साफ इन्कार केला आहे. ही सारीच कपोलकल्पित कथा असून काही मर्ख मंडळींच्या डोक्यामधील कुचकट विचारातून ती आकाराला आली आहे. या संदर्भात बोलताना शारदाबाई म्हणतात– मी तर एक संन्यासिनी. लोक काय म्हणतात याच्याशी मला काय करायचे आहे? तथापी मान्यवर लोकांवर जेव्हा अकारण शिंतोडे उडविले जातात तेव्हा त्याचा खुलासा करणे ही एक अपरिहार्य गोष्ट होऊन बसते. जवाहरलालजींच्या आणि माझ्या संबंधाबाबत जे लिहिले गेले आहे त्याबाबतचा सविस्तर खुलासा करणारे पुस्तक मी लिहिले असून त्यामध्ये सर्व गोष्टींचा खुलासा केला आहे. त्या सर्व गोष्टी पुस्तकामध्ये आल्या असल्याने आत्ताच त्याबाबत काही बोलणे, आपल्याला उचित वाटत नाही असेही या माताजींचे म्हणणे आहे.

जवाहरलालजी निधर्मी धोरणाचे पुरस्कर्ते म्हणून सर्वत्र ओळखले जात असत. त्यामुळे त्यांनी एका संन्यासी स्त्रीबद्दल विशेष आपुलकी बाळगावी, तिच्या वारंवार गाठीभेटी घ्याव्या, तिच्याशी पत्रव्यवहार करावा ही गोष्ट अनेकांना साफ नामंजूर होती. मथाई हे या मंडळींपैकीच एक असल्याचा खुलासा करून माताजी म्हणतात– आमच्यामध्ये दुरावा निर्माण करणे अशक्य आहे हे लक्षात आल्यावर माझ्यावर विषप्रयोग करण्याचे प्रयत्नही झाले. मी स्वतः कधी हा विषय जवाहरलालजींजवळ काढला नाही. तथापी त्यांनी मात्र मला असल्या छुप्या हमल्यापासून जपून राहण्याचा सल्ला दिला होता. एकदा मथाई यांच्या सांगण्यावरून आपली गाडी पंडितजींच्या बंगल्याबाहेर थांबविण्यात आली. पुढे पंडितजींनाही ही गोष्ट कळल्यावर 'महामूर्ख मनुष्य' अशा शब्दात त्यांनी मथाई यांची संभावना केली होती. जवाहरलालजींच्या कुटुंबियांशी आपला विशेष परिचय नव्हता. एकदा जवाहरलालजी आपल्या छोटया नातवांना घेऊन आपल्याला भेटायला आले होते, असा दावा करून शारदामाता म्हणतात– त्या कोवळया वयातील गोंडस मुलांनी आपल्या आजोबांच्या सांगण्यावरून मला अभिवादन केले आणि मी त्यांना आशीर्वाद दिला. नेहरू कुटुंबियांना माझे जवाहरलालजींकडे जाणे-येणे फारसे पसंत नसले तरी याबाबत प्रत्यक्ष काही कृती करण्याची हिंमत कुणी दाखविली नाही. या बाईंची आणि जवाहरलालजींची पहिली भेट झाली त्या वेळी बाईंचे वय पस्तीस वर्षांचे होते तर त्यांची स्वतःची मुलगी इंदिरा त्या वेळी तीस वर्षांची होती. पंडितजींबरोबर झालेल्या पहिल्या भेटीचा तपशील पहाण्यापूर्वी ही भेट कशी व कोणामुळे झाली हे पहाणे रंजक ठरेल. शारदामाता यांच्या

पृष्ठ २४ वर

# आमचे आंतरजातीय विवाहमंडळ

## प्रा. देवदत्त तुंगार

महात्मा फुले, शाहूमहाराज, डॉ. आंबेडकर आदींनी जातीयता निर्मूलनासाठी दीर्घ काळ काम केले असले तरी अजून जातीयवादाचे भूत भारतीय समाजाच्या मानगुटीवर बसलेलेच आहे. व्यासपीठी घोषणा आणि वृत्तपत्रीय लेखन यातून जातीयता नष्ट करण्याचा आग्रह दिसतो; पण जाणीवपूर्वक जातिनिरपेक्ष समाजनिर्मितीचा प्रयोग करण्याचे प्रयत्न तुरळकच दिसतात. पूज्य सानेगुरुजींची घडपडणारी मुले व राष्ट्रसेवादलातील कार्यकर्ते यांनी 'आंतरजातीय' विवाहाद्वारे एकसंध समाजनिर्मितीस हातभार लावला आहे. आर्यसमाजाचे संस्थापक महर्षी स्वामी दयानंदसरस्वती यांच्या शिकवणीनुसार मराठवाड्याच्या पाच जिल्ह्यांत १९७० सालापासून आंतरजातीय विवाहमंडळामार्फत अनेक आंतरजातीय विवाह जुळविण्यात आले आहेत. या मंडळाचा अध्यक्ष या नात्याने या संदर्भात अनेक प्रश्न मला पुष्कळदा विचारण्यात येतात. मंडळाचे काम करताना विविध प्रकारचे अनुभवही येतात. या दृष्टीने काही स्वानुभव व रेणापूर, ता. अंबेजोगाई, जि. बीड येथील आमच्या आंतरजातीय विवाहमंडळाची वैचारिक भूमिका थोडक्यात विशद करावीशी वाटते.

शिक्षण किंवा व्यवसायाच्या निमित्ताने तरुण-तरुणींनी एकत्र येणे, त्यातून सहवास व प्रेम वाढणे व त्यातून आंतरजातीय विवाह घडलेले आपण पाहतो; पण जातीयता निर्मूलनाच्या उद्देशाने व जातिनिरपेक्ष समाजनिर्मितीचा प्रयोग म्हणून जाणीवपूर्वक (Arranged Intercaste Marriages) आंतरजातीय विवाह घडवून आणण्याच्या दृष्टीने आमचे मंडळ कार्य करते.

दळणवळणाची वाढती साधने, औद्योगिक संस्कृतीचा वाढता व्याप व काहीशी उदारमतवादी विचारसरणी यामुळे सार्वजनिक जीवनातील जातीयतेचे कंगोरे थोडयाफार प्रमाणात बोथट झालेले दिसतात; परंतु वैयक्तिक व कौटुंबिक जीवनात 'जात' हा प्रभावी नियंत्रक घटक आहे हे मान्यच करावे लागते. विशेषतः विवाहसंबंध जुळविताना 'जात' ह्याच घटकाला आजही अग्रक्रमच दिला जातो.

मी सानेगुरुजी सेवादल या परिवारातला. अहमदनगरचे आमचे यजुर्वेदी ब्राह्मण-घराणे. वडील प्रारंभापासूनच पुरोगामी समाजसुधारक व कोल्हापूरच्या छत्रपती शाहूमहाराजांच्या सहकार्याने 'आर्यभानु' हे आर्यसमाजाचे नियतकालिक त्यांनी अनेक वर्षे चालविले. आजही मराठवाड्यात नांदेड येथे वयाच्या ८५ व्या वर्षी आर्यसमाजाचे कार्य ते करीत असतात. अहमदनगरहून मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर हैदराबादला उच्च शिक्षणासाठी मी १९५४ ते ६० पर्यंत राहिलो व आर्यसमाजी नेते माजी मंत्री कै. विनायकराव विद्यालंकार, पंडित नरेन्द्रजी, बन्सीलालजी व्यास आदींचा सहवास लाभला. हैदराबादहून नांदेड येथे आलो व विवाह करायचा तो आंतरजातीय असा मनाशी निश्चय केला. नांदेडला श्री. शिवराम जिदम या साळी समाजातील आर्यसमाजी कार्यकर्त्यांचे सामाजिक कार्य व ध्येयनिष्ठा पाहून प्रभावित झालो व ऋणानुबंध वाढल्याने त्यांचा जावई झालो. श्री. जिदम यांनी आपल्या पाचही मुलींचे आंतरजातीयच विवाह केले. त्यांचे एक नंबरचे जावई भावसार रंगारी समाजाचे, मी दुसरा जावई ब्राह्मण, तिसरे जावई लिंगायत जंगम समाजाचे, चौथे जावई खत्री समाजाचे आंध्रप्रदेशातील आणि पाचवे जावई ब्राह्मण जातीचे. जिदमजींचे चिरंजीव सत्यव्रत याने मारवाडी समाजातील मुलीशी विवाह केला आहे.

सासुरवाडीला आम्ही जावईकंपनी जिदमवाडीत जेव्हा अनेकदा जमतो तेव्हा गुरुजींच्या 'आंतरभारती'चाच काही अंशी प्रत्यय येतो. अनेक दिवस तर कोण कोणत्या 'जाती'चा आहे याचीच आम्हाला कल्पना नव्हती. लोकरूढीप्रमाणे परस्परांची 'जात' आता माहीत झाली असली तरी 'माणूस' म्हणूनच एक दुसऱ्याकडे पाहण्याची स्वाभाविक वृत्ती असल्याने अमका नातेवाईक कोणत्या जातीचा आहे असे कोणी सहज विचारले तर लगेच उत्तर देता येईलच असे नाही. (वा दिले तरी ते बरोबरच असेल याची शाश्वती नाही!) आमच्यापैकी कोणाच्याही घरात सर्व जाती-धर्मांच्या लोकांना 'मुक्त द्वार' असते. चहा-फराळ, जेवणखाण, एखादा वैदिक विधीचा संस्कार किंवा धार्मिक कार्यक्रम असो; ब्राह्मण, मराठा, महार, तेली, साळी, कोष्टी, लिंगायत, मुसलमान व इतर कोणीही असो. सर्वांना सारखीच वागणूक व सर्वांनाच थेट स्वयंपाकघरापर्यंत मुक्त प्रवेश. कोणत्याही बाबतीत 'पंक्तिप्रपंच' कधी दिसणार नाही.

भिन्न जातीची पण एकमेकांची नातेवाईक असलेली माणसे एकत्र आली तर त्यांचा परस्परांशी कसा व्यवहार होतो याबद्दल अनेकांना औत्सुक्य (व काहींना चिंता) वाटते! जातीवरून कटुता निर्माण होत असावी अशीही शंका अनेकांना वाटते; पण मी स्वानुभवावरून सांगू शकतो की, सासू-सासरे, मेहुणा-मेहुणी, साडू यांच्या परस्पर संबंधात 'जाती'वरून कधी संघर्ष किंवा कुरबूर झालेली नाही. कारण आम्ही सर्वांनीच मनातून 'जात' पूर्णपणे काढून टाकली आहे. वैयक्तिक आवडीनिवडी रुची-अरुची याबातीत पूर्णपणे स्वातंत्र्य आहे.

आपापसात उच्चनीचतेचे समज नसले तरी समाजातील इतर लोकांचे गैरसमज असू

शकतात. माझे आईवडील सुधारक विचाराचे आहेत; पण वडिलांचे सख्खे बंधू व इतर नातेवाईक सनातनी ब्राह्मण कुटुंबाचेच प्रतिनिधी. दुसऱ्या जातीच्या मुलीशी विवाह करून समाजाला मी 'धडा' शिकविण्याचे काम करू नये, असे काही नातेवाइकांनी सुचविले. अर्थात उघड विरोध कोणी केला नाही; पण ब्राह्मणासारख्या उच्च (?) कुळातील मुलगी मिळणे शक्य नसल्यानेच आंतरजातीय विवाह केला असे लोकांना (म्हणजे कोणाला?) वाटणार नाही काय? ब्राह्मण जातीतील एखादी गरीब मुलगी हुंडा न घेता करून घेऊन समाजाला ''सुधारता' येणार नाही काय? अशा आशयाचे प्रश्न जवळचे आप्तस्वकीय विचारीत. आंतरजातीय विवाहामुळे संततीच्या लग्नाचा प्रश्न अवघड होऊन बसेल, अशी काळजीयुक्त स्वरात अप्रत्यक्ष भीतीही दर्शवीत; पण आपल्या कुटुंबाच्या सांस्कृतिक स्तराशी मिळतेजुळते घराणे असेल, गुणकर्मस्वभाव सारखा असेल आणि आवडनिवड बरीचशी समान असेल तर दुसऱ्या जातीशी विवाहसंबंध जोडण्यात चूक काय? असे मी विचारीत असे. एखादा निर्णय मूल्याधिष्ठित व विचारांती पक्का केला म्हणजे तो कोणतीही किंमत द्यावी लागली तरी प्रत्यक्षात आणायचाच असा माझा स्वभाव असल्याने, विवाहानंतर नातेवाइकांकडून फारसा विरोध झालाच नाही. माझे चुलतबंधू शिवराम बापू तुंगार 'दत्ताने काही वाईट केले नाही, सुसंस्कृत व सुधारक साळी घराण्यातील मुलगी केली, जात जन्मावर आधारित नसते व गुणकर्मस्वभावाने त्या मुलीला ब्राह्मणच समजायला हवे' असे म्हणून आमच्या आंतरजातीय विवाहाचे समर्थन करीत.

विवाहानंतर तब्बल एक तपाने ब्राह्मण कुटुंबात आलेल्या परजातीच्या तरुणीची प्रतिक्रिया समजून घेण्यासाठी पत्नीला मी सहज विचारले तेव्हा ती म्हणाली, 'माझ्या (समजल्या जाणाऱ्या) साळी जातीत अनेक श्रीमंत घराणी आहेत; परंतु असंस्कृत व्यसनाधीन श्रीमंतीपेक्षा इथले सुसंस्कृत (पण गरिबीचे वातावरण मला मोलाचे वाटते. वडील आर्य समाजी झाले, आंतरजातीय विवाह घडवून आणण्याचा विचार व तो प्रत्यक्षात आणण्याचा निर्धार त्यांनी केला, म्हणूनच एक प्रकारचे नवे जीवन मला प्राप्त झाले. अन्यथा माझ्या चुलतबहिणी व इतर नातेवाईक मुलींप्रमाणे मागासलेल्या समाजातील स्त्रीचे दयनीय उपेक्षित जिणे माझ्या वाट्याला आले असते!' माझ्या पत्नीची ही भावना मागास समजल्या जातीतले तरुणीची प्रातिनिधिक भावना आहे असे म्हणता येईल.

विवाहासारख्या कौटुंबिक बाबतीत अद्याप जातीयतेचे गंड आहेत. अहंगंड असो की न्यूनगंड असो, तो केव्हाही वाईटच. शतकानुशतके जातीचा पगडा असलेल्या समाजातील हे गंड दूर करण्यासाठी योजनाबद्ध प्रयत्न केले पाहिजेत. 'आंतरजातीय विवाह करणाऱ्यांची जात' असे संकुचित स्वरूप आमच्या मंडळास येऊ नये व हे वर्तुळ अधिक व्यापक व विस्तृत व्हावे यासाठी या विचारांच्या मंडळींना सादर, सप्रेम, प्रकट निमंत्रण आहे. हे काम आमचे, तुमचे व या विचाराच्या सर्वांचे आहे. मंडळाच्या वार्षिक मेळाव्यास परस्पर परिचय कार्यक्रमास साद देऊ इच्छिणाऱ्या व या कार्याबद्दल आस्था असणाऱ्या मंडळींनी श्री. लोखंडे, कार्यवाह, आंतरजातीय विवाह मंडळ, रेणापूर, ता. अंबेजोगाई, जि. बीड किंवा प्रा देवदत्त तुंगार, मु. पो. सासवड, जि. पुणे या पत्यावर संपर्क साधावा. सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. ह. मो. मराठे, पत्रकारपरिषदेचे अध्यक्ष श्री. रंगा वैद्य आदींनी मंडळाच्या मेळाव्यास रेणापूर येथे उपस्थित राहून आमच्या या जातिनिरपेक्ष समाजनिर्मितीच्या अभिनव प्रयोगाबद्दल विशेष आत्मीयता दर्शविली असून अनेक विचारवंतांनी व कार्यकर्त्यांनी सक्रिय सहकार्य देण्याचे आश्वासन दिले आहे. □

---


## प्रकाशनाच्या वाटेवर

# पश्चिमेचे पुत्र

रवींद्र पिंगे

ऑस्कर वाइल्ड
अर्नेस्ट हेमिंग्वे
विन्स्टन चर्चिल
एडगर वॉलेस
......

पश्चिमेच्या या प्रतिभावंतांची
सुंदर व्यक्तिचित्रे

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०.**
**चवदा रुपये**

# मृत्यूला आव्हान देणारे इराणी विद्यार्थी

निशिकांत भालेराव, नवी दिल्ली

शिक्षण झाल्यानंतर बेकार म्हणून बाहेर पडण्याचे भाग्य भारतीय विद्यार्थ्यांना मिळतं; पण शिक्षण झाल्यावर इराणचे १७ विद्यार्थी जेव्हा जवाहरलाल नेहरू विद्यापीठ व दिल्ली विद्यापीठाच्या पदव्या हातात घेऊन आपल्या इराण देशात जातील तेव्हा त्यांच्या समोर साक्षात् मृत्यू उभा राहील ! भारतात शिकत असलेल्या इराणच्या विद्यार्थ्यांसमोर सध्या तरी मृत्यू दिसत आहे !

गेले काही दिवस दिल्लीच्या सर्व विद्यार्थीवर्गामध्ये फार अस्वस्थता आहे. २–३ कॉलेजचे विद्यार्थी अचानक संपावर गेले. नेहरू विद्यापीठ व दिल्ली विद्यापीठात रात्री–बेरात्री मीटिंग्ज होत आहेत. २०० विद्यार्थ्यांना अटक झाली. दोन ठिकाणी लाठीमार झाला. ह्याचा परिणाम लगेच जयपूर, आग्रा येथील विद्यार्थ्यांवरही झाला. दोन्ही ठिकाणी विद्यार्थ्यांना अटका झालेल्या आहेत.

आणि ह्या सर्व असंतोषाचे कारण म्हणजे ४ दिवसांच्या भारतीय भेटीसाठी येऊन गेलेले इराणचे मोहम्मद रझा शाह पेहलवी आर्या मेहेर. भारतीय शासनाशी आर्थिक व औद्योगिक क्षेत्रात सहभाग वाढविण्यासाठी इराणच्या शाहनी दिल्लीस भेट दिली. त्यांच्याबरोबर अर्थातच खुबसूरत शाहबानो ह्या त्यांच्या राणीसाहेब होत्या. इराणचे शाहसाहेब येणार आहेत हे लक्षात घेता भारतात शिक्षण घेत असलेल्या तमाम इराणी विद्यार्थ्यांवर भारत सरकारने एक निबंध लादला. ह्या निबंधामध्ये असे स्पष्टपणे बजावले होते की, 'कोणीही इराणी विद्यार्थी त्याच्या अधिकृत राहण्याच्या जागेवरून विनापरवाना हलणार नाही आणि ह्या इराणी विद्यार्थ्यांनी ही 'ऑर्डर' मोडून एखाद्या निदर्शनात भाग घेतला तर त्याला लगेच इराणला पाठविण्यात येईल ! ( He will be immediately deported. )

ह्या दोन ओळींच्या स्वातंत्र्य हिरावून घेणाऱ्या बंदीहुकुमामुळे असंतोष पेटून निघाला; पण स्वातंत्र्याचे गोडवे गाणाऱ्या जनता सरकारला असा हुकूम का बजावावा लागला हयाची पार्श्वभूमी मजेशीर आहे. एक पोलिसअधिकारी सांगत होता की, 'इराणचे शाह मागच्या महिन्यात अमेरिकेत गेले होते. त्या वेळेस त्यांच्याविरुद्ध फार प्रचंड प्रमाणात तेथील इराणी विद्यार्थ्यांनी निदर्शने केली. ह्या निदर्शनाने नंतर हिंसक वळणसुद्धा घेतले. हे सर्व लक्षात घेता त्या वेळेपासून 'शाह ऑफ इराण' ज्या ज्या देशात जातात तेथे त्यांच्याविरुद्ध निदर्शने होऊ नयेत म्हणून हा हुकूम लोकशाही देशात बजावला जातो आणि अमेरिकेतील इराणी विद्यार्थी संघटनेने भारतातील लोकशाही युवक व इराण विद्यार्थी संघटनेला निदर्शनाचा 'मेसेज' पाठविला आहे, म्हणूनच आम्ही काळजी घेतली आहे.' ऐकून मजा वाटली. विरोधाचा आवाज दडपून टाकण्यासाठी किती साधा हुकूम काढता येतो ! तुम्ही तुमचे हॉस्टेल सोडले व निदर्शनात भाग घेतला तर तुम्हाला इराणला पाठविले जाणार ! पुन्हा इराण. म्हणजे साक्षात मृत्यूच्यां दाढेत !

इराण !

तेलाच्या साठयावर श्रीमंत झालेला देश !

गेली कित्येक वर्षे एकाधिकारशाहीखाली असलेला इराण.

'तो' इराणचा विद्यार्थी नाव सांगायला तयार होत नव्हता. खरं तर नेहरू विद्यापीठाच्यां हॉस्टेलमध्ये राहत असलेले १७ इराणी विद्यार्थी शाहांच्या आगमनापूर्वी दोन-तीन दिवस कोणाशीच बोलत नव्हते. एक प्रचंड भीती त्यांच्यासमोर उभी राहिली होती.

इराणमध्ये राजेशाही आहे हे समजू शकते; पण नक्की काय चालले आहे हे आम्हाला कसे समजणार ? असे त्याला विचारताच तो उठला. खोलीचा दरवाजा उघडून बाहेर गेला. 'तो' आत आला तेव्हा त्याच्यासारखेच दिसणारे उंच धिप्पाड असे २–३ विद्यार्थी त्याच्याबरोबर होते.

त्याने सुरवातीलाच स्पष्ट केले. आम्ही आमच्या देशाच्या राजासमोर निदर्शने करण्याचा निर्णय घेतला आहे. आमच्यावर बंदीहुकूम आहे. आम्हाला डिपोर्ट करण्याची भीती आहे हे खरे असले तरी इराणच्या स्वातंत्र्यासाठी झगडणाऱ्या असंख्य क्रांतिकारकांसाठी पाठिंबा म्हणून व शाहासाहेबांच्या क्रूर वागणुकीच्या निषेधार्थ आम्ही निदर्शने करणार आहोत. आता तुम्ही म्हणाल, इराणच्या जनतेच्या हक्कासाठी भारतात लढून काय फायदा होणार ? पण भारतातील आणीबाणीच्या वेळेस सुब्रह्मण्यमस्वामी वगैरे सारख्यांनी व इतर अनेक भारतीयांनी परदेशात आणीबाणीचा निषेध करून भारतीय लोकशाहीसाठी झगडणाऱ्यांचे नैतिक बल वाढविले का नाही ? आमचासुद्धा तोच प्रयत्न आहे; पण त्यात तुमच्या सरकारने अडचण निर्माण केली आहे. आम्हाला इराणमध्ये आवाज उठवता येत नाही. लोकशाही भारतात आम्ही आवाज उठवला तर आम्हाला शाहांसाहेबांच्या हवाली केले जाणार ! पण आम्ही घाबरणार नाही. शहांनी आपल्या स्वतःच्या ऐश्वर्यासाठी ९० हजार राजकीय कार्यकर्त्यांना गेल्या २० वर्षांपासून पकडून ठेवलेले आहे. २५ वर्षांच्या जन्मठेपीच्या शिक्षा पूर्ण झाल्यानंतरसुद्धा कित्येकांना शाहासाहेबांच्या खाजगी न्यायालयांनी शिक्षा ठोठावल्या आहेत. कुठे आहेत ते माझे एक लाख बांधव ? तुम्ही विचारणार आहात काय हा प्रश्न आमच्या शाहासाहेबांना ? आम्ही मात्र विचारणार आहोत ! ( त्या इराणी विद्यार्थ्यांच्या डोळ्यात सहजपणे अश्रू तरळतात.) If we yet good support from all over the world I am sure, Iran will be free one day ! And shah of Iran will be under my foot ! असे म्हणत तो ताडकन् उभा राहतो. आपण भावनावश झाल्याचे त्याला कळून चुकते. तो बोलायच्या मूडमध्ये दिसत नाही. शांतता पसरते. सर्व इराणी विद्यार्थी अस्वस्थ होतात. तेवढ्यात दुसरा

इराणी विद्यार्थी बोलायला लागतो. तो चक्क आमच्यापुढे अॅमनेस्टी इंटरनॅशनलचा एक रिपोर्ट फेकतो, एक न्यूजविकचा अंक पुढे टाकतो व आपल्या मोडक्यातोडक्या इंग्रजीत शांत वातावरणाचा भंग करतो. तो सांगतो शाहासाहेबांच्या रक्षणासाठी आमच्या देशात एक खास पोलिसपथक तयार करण्यात आलेले आहे. त्याचे नाव 'सावाक.' ह्या पोलिसांवर ७३–७४ साली शाहसाहेबांनी २४८ कोटी रुपये खर्च केले आहेत आणि ह्या खास सावकांवरचा खर्च दरवर्षी वाढत जात आहे. ह्या पोलिसांचे स्वत.चे असे कारागृह आहेत. टॉर्चर चेंबर्स आहेत. एवढेच नव्हे तर ५० च्यावर कॉन्स्ट्रेशन कॅम्प्स आहेत. ह्या सर्व पोलिसांच्या कृत्यांना कोणीही विरोध करू शकत नाही. ह्या सर्वांचा प्रमुख आहे ड्राकुला शाहसाहेब.

तुम्ही विश्वास ठेवणार नाही. इराणमधील जनता आज किती यातना भोगीत आहे! पोलिसवाले चक्क दिवसाढवळ्या राजकीय कार्यकर्त्यांच्या घरात शिरून त्यांच्या बायकांवर बलात्कार करतात. त्यांच्या अब्रूचा लिलाव नवऱ्यावर व मुलांवर बघण्याची पाळी ह्या शाहसाहेबांनी आणली आहे.

गुन्हा काय? तर हुकुमशाहीविरुद्ध कोणी एक कविता केली, कोणी नागरी स्वातंत्र्याच्या घोषणा भिंतीवर लिहिल्या. हा झाला गुन्हा व त्यासाठी नुसते कारागृह नाही; तर छळकेंद्रात नेऊन स्त्रियांच्या गुप्त भागात व पुरुषांच्या मुख्य अवयवास ४८० कि. वॅटचे शॉक देण्यात येतात. ह्या शॉकसाठी एक खास प्रकारचे यांत्रिक उपकरण व टेबल तयार करण्यात आलेले आहे. ह्या टेबलावर झोपवून ते तापवले जाते. हे मी सांगतोय म्हणून तुम्ही विश्वास ठेवू नका. ब्रिटिश मजूरपक्षाचे खासदार जॉन वॉटकीन ह्यांनी आपल्या रिपोर्टमध्ये ह्या साऱ्या गोष्टी उजेडात आणल्या आहेत. आमच्या डोळ्यांसमोर अशा गोष्टी घडल्यानंतर आम्ही शाहासाहेबांचे फुलांचे हार घालून स्वागत करायचे का?

दुसरा इराणी विद्यार्थी सुद्धा खूप तापलेला असतो. त्याला थांबवावे असे वाटत नाही. तो सांगत सुटतो. तुम्हाला माहिती आहे? ह्या शाहसाहेबांनी राजकीय कार्यकर्त्याप्रमाणेच विद्यार्थी, शेतकरी, लेखक, *सैन्यातील अधिकाऱ्यांना ठार मारले आहे*. दोन गोष्टी माझ्या देखत घडलेल्या आहेत. तेहरान विद्यापीठात विदा हाजेब–ई–तापीजी नावाची एक मुलगी समाजशास्त्र विषयात इराणमधील ग्रामीण लोकसंख्येवर संशोधन करीत होती. तिने काढलेले निष्कर्ष व संशोधनकार्य शहासाहेबांच्या अधिकाऱ्यांना आवडले नाही. म्हणून १९७२ मध्ये विदा तापीजीला अटक करण्यात आली. ५ वर्षांपासून कोणत्याही प्रकारची न्यायालयीन चौकशी किंवा खटला न चालवता तिला डांबून ठेवले आहे. हे तर काहीच नाही. नासेर–रहमानी नाजेद नावाच्या माझ्या मित्राला–१९७५ मध्ये चक्क ११ वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आली. ह्याचे कारण काय? तर नासेर मॅक्झिम *गॉर्कीचे एक नाटक बसवीत होता. शाहासाहेबांच्या पोलिसांना जे* अयोग्य वाटेल त्याला लगेच यमसदनाला पाठविण्यात येते. खास करून विद्यार्थ्यांना. आता मागच्याच वर्षीची गोष्ट सांगतो. ससेक्स विद्यापीठातून पदवी घेऊन बाहेर पडलेल्या मोहम्मद सफारी ह्या विद्यार्थ्याला मातृभूमीस परतल्यावर लगेच पकडण्यात आले. तो अतिरेकी असल्याचा शाहासाहेबांच्या 'सावकां'चा आरोप होता. मोहम्मदच्या घरी प्रथम त्याला १५ वर्षांची शिक्षा झाल्याचे सांगण्यात आले. ५ वर्षांनी त्याला जन्मठेप ठोठावण्यात आल्याचे सांगितले गेले आणि एके दिवशी मोहम्मदच्या आई–वडिलांनी बातमी वाचली, त्याला मारण्यात आल्याची. (He had been excuted)

इराणी विद्यार्थ्यांच्या त्या निळ्याशार डोळ्यांत रक्त चढल्याचे दिसत होते. माझ्या अंगावर शहारे आलेच होते. शिवाय मनात आणीबाणीच्या काळातील संजयकृत्यांशी तुलना चालली होती. *अर्थात इराणमधील ह्या कत्तलींच्या मानाने आपण* फारच '*लकी*' होतो असे माझा मित्र कानात हळूच म्हणाला. रात्रीचे दोन वाजले होते. उद्या होणाऱ्या निदर्शनांसाठी बॅनर्स रेकार्डस् तयार करणे चालूच होते; पण इराणी विद्यार्थ्यांच्या लढ्याविषयी जाणून घेण्याची इच्छा होतीच.

शाह ऑफ इराणविषयी तुम्ही काही अधिक माहिती सांगू शकाल काय?' मी प्रश्न केला.

'त्या नीच पशूविषयी (शिवाय बास्टर्ड वगैरे) काही सांगण्यासारखे नाही.' दोन तीन इराणी विद्यार्थी म्हणाले.

त्यामधील एकजण सांगायला लागला. गेल्या २५ वर्षांपासून सध्याचे शाहसाहेब इराणवर सत्ता गाजवीत आहेत. अझरबयान व कुरदीस्तान येथील स्वातंत्र्यलढे चिरडून काढण्यात १९४० साली त्यांनी प्रथम प्रयत्न केला. डॉ. मूसादेघ ह्यांच्या लोकप्रिय सरकारला १९५३ मध्ये शाहसाहेबांनी अमेरिकेच्या हस्तकांची मदत घेऊन खड्डयात घातले. एके दिवशी अचानक लष्कराच्या सहाय्याने शाहसाहेबांनी डॉ. मूसादेघ ह्यांना पदच्युत केले व स्वतः ते सम्राट झाले. लगेच त्यांनी पोलिसराज्य अंमलात आणण्याची घोषणा केली. आपल्याविरुद्ध कोणी काही बोलल्यास त्याला शिक्षा करण्याचे अनेक कायदे त्यांनी काढले. सावक नावाची खास गुप्त पोलिसयंत्रणा निर्माण केली. त्यांच्या हुकुमशाही राजवटीला होणारा विरोध लक्षात घेता एके दिवशी त्यांनी घटनेत बदल करून घेतला. With the modification of the Millitary Law : All members of groups who engage in plans to use material in *opposition to the monarchy will be shot.*

आता अजून काय सांगायचे अशा हुकुमशहांविषयी?. तेलाच्या विक्रीतून मिळालेले करोडो रुपये इराणच्या सामाजिक–आर्थिक विकासासाठी खर्च न करता ५४ लाख डॉलर्सची ९ मोठी हॉटेल्स! स्वतःच्या सत्तेचा रौप्यमहोत्सव साजरा करण्यासाठी ६२० लाख रुपये शाहसाहेबांनी उधळले आहेत! शिवाय पेन्टेगॉन समितीचा अहवाल सांगतो की, अमेरिकेकडून शस्त्रांची खरेदी करणाऱ्या देशात इराणचा पहिला क्रमांक लागतो. ४ करोड डॉलर्सची शस्त्रे इराण विकत घेतो, तर ३ कोटींची ब्रिटन, फ्रान्स ह्या देशांकडून. ह्या सर्वांचा उपयोग एकच. इराणच्या स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या जनतेला *ठार मारण्यासाठी. आता असे अमेरिकेचे हस्तक भारतात येऊन* कार्टरसाहेबांनी जे पढविले ते बरळणार! शिवाय भारतातील लोकशाही लढ्याचे, जनता पार्टीचे कौतुक करणार आहे. एकूण मजा आहे.

त्या इराणी विद्यार्थ्यांनी बरेच काही सांगितलेले असते. आता फारसे विचारण्यासारखे नसते; पण इराणी विद्यार्थ्यांची संघटना

कशा प्रकारे कार्य करते आहे हे जाणून घेण्यासाठी एक शेवटचा प्रश्न मी त्यांना टाकतो.

'पण तुमची संघटना नक्की कोणत्या प्रकारे शाहसाहेबांच्या हुकुमशाही विरुद्ध लढा संघटित करीत आहे ?'

सर्व विद्यार्थी एकमेकांकडे पाहतात. बहुधा गुप्ततेच्या नावाखाली ते सांगण्याचे टाळतील असे मी गृहीत धरून होतो; पण एकाने काही अटीवर सांगण्याचे मान्य केले. तो सांगू लागला—

आमच्या संघटनेचे नाव फरयाद विद्यार्थी संघटना असे आहे. १९५३ नंतर शाहसाहेबांनी अवैध मार्गांनी सत्ता हस्तगत केल्यानंतर, प्रथमच आपल्या नागरी हक्कासाठी लढण्याची जाणीव इराणच्या विद्यार्थ्यांमध्ये वाढायला लागली. तेलविक्रीनंतर हातात पैसा येऊनही इराणचे दारिद्र्य शाहसाहेब हटवू शकले नाहीत. त्यामुळे सहाजिकच असंतोष वाढला. शाहसाहेबांना 'वॉल्ट रोस्तोव्ह पॅकेज' योजना स्वीकारावीच लागली. ज्यामध्ये एकीकडे सुधारणेच्या नावाखाली विरोधी पक्षांना दडपण्याची संधी त्यांना मिळाली. 'पांढऱ्या क्रांती'ची अंमलबजावणी सुरू झाली. ज्यामुळे ग्रामीण भागातील हजारो लोक नौकरी व अन्नाच्या शोधात शहराकडे यायला लागले. ५ जून १९६३ रोजी १५ हजारांच्या एका मोर्चावर गोळ्या चालविल्या गेल्या व आमच्या संघटनेचे कार्य विस्तारले गेले. आता तुम्ही निश्चितपणे Functioning विचारले तर सांगणे अवघड आहे; पण प्रामुख्याने तेहरान, आर्यमेहर, ससेक्स ह्या विद्यापीठांत आमच्या संघटनेचे विद्यार्थी जमेल त्या पद्धतीने (हिंसकसुद्धा) शाहसाहेबांविरुद्ध हालचाल करीत असतात. अमेरिकेत ४० हजार इराणी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. *अमेरिकेच्या साम्राज्यवादी धोरणाचा निषेध करून* शाहसाहेबांविरुद्ध मोठ्या प्रमाणावर आम्ही वॉशिंग्टनला निदर्शने केली होती. भारतात फक्त ४० इराणी विद्यार्थी आहेत. अर्थात सर्वच आमचे सभासद नाहीत. Execution च्या भीतीमुळे कित्येक इराणी विद्यार्थी आपले खरे नांव सांगत नाहीत. लोकशाही देशांतून इराणमधील लढ्यास पाठिंबा मिळविण्याचे प्रयत्न आम्ही करीत आहोत. त्यामुळे एक दिवस तरी इराणवर बाहेरून दबाव येईल असे आम्हाला वाटते. ह्यापेक्षा जास्त तुम्हाला आमच्या बुलेटिनवरून समजेल.

असे सांगून तो २०–२५ बुलेटिन्स माझ्यासमोर फेकतो. खोलीत गठ्ठे असतात. सकाळचे ४ वाजलेले असतात. तपमान शून्यावर घसरलेले असल्याची जाणीव हॉस्टेलमधून बाहेर पडल्यावर होते. मनात एकच विचार असतो. उद्या शाह ऑफ इराणचे स्वागत कसे होणार ?

## दि. २ फेब्रुवारी

कोणी परदेशी पाहुणे येणार असले की राष्ट्रपतिभवनाच्या समोरील रस्त्यावर विविध रंगांचे झेंडे लावले जातात. आजही झेंडे दिसत होते. सोबत भारताचा एक व इराणचा एक झेंडा फडफडत होता. दिल्ली शहरातील प्रमुख रस्त्यांवर शाहसाहेब आपल्या राणीसाहेबांच्या समवेत असलेले १० फूट उंचीचे प्रचंड पोर्ट्रेट्स लावले होते. शिवाय शाहसाहेब व राणीचे स्वागत करणाऱ्या असंख्य कमानी उभारल्या गेलेल्या दिसत होत्या. कॅनॉट प्लेस ह्या प्रमुख चौकात तर बऱ्याच कमानी होत्या. संध्याकाळचे ५ वाजतात. रिगल सिनेमाच्या समोर पोरांचा घोळका उभा असतो. विमानतळावरून पाहुण्यांच्या गाड्या निघाल्या आहेत असा निरोप येतो. नेहरू *विद्यापीठ व दिल्ली विद्यापीठातील* हजारांवर पोरं भराभर रस्त्याच्या बाजूने पांगतात. पोलिसांना गडबड होणार असल्याची कल्पना असतेच. जाळ्या, लाठ्या घेऊन पोलिस रस्त्याच्या बाजूला कडे करतात. हे कमी पडते की काय म्हणून ५० च्या वर घोड्यांवर बसलेले पोलिसदल येते. हळूहळू तणाव वाढतो. हातात फलक घेऊन एक टोळके रस्त्यावर येते. पोलिसांची धावपळ होते. इराणी विद्यार्थी मात्र त्यात कुठेच दिसत नाहीत.

तेवढ्यात मोटारींचा ताफा येतो. इकडे पोरांच्या घोषणा सुरू होतात— शाह ऑफ इराण कौन है ? खुनी तानाशाह है ! वुई डिमांड फ्रीडम !' आता रस्त्याच्या बाजूंनी उभी असलेली पोरे हळूच काळे झेंडे काढतात. पोलीस वैतागतात. लांबलचक परदेशी गाड्या पुढे सरकतात. ह्यातील नेमक्या कोणत्या गाडीत शाहसाहेब बसले आहेत हे पोरांना समजत नाही. तेवढ्यात एक लांब गाडी इराणचा झेंडा लावलेली पोरांना दिसते. पत्रके उधळली जातात. शाहसाहेबांच्या पोर्ट्रेट्सवर माती फेकण्याचा उद्योग कोणी तरी करतो. तेवढ्यात त्या गाडीवर दोन पोरं उडी घेतात. कच्कन् ब्रेक लागतात. मागच्या १५–२० गाड्या धडाधड थांबतात. इकडे पोलीस त्या पोरांना गाडीच्या टपावरून खाली खेचण्याचा प्रयत्न करतात तर पोरं चक्क नाचायला व घोषणा द्यायला लागतात. तेवढ्यात कोपऱ्यातून लाल रंगाचे 'मास्कस' घातलेली काही पोरं रस्त्यावर येतात. हेच ते *इराणी विद्यार्थी.* '*खुनी शाहसाहेबांचा धिक्कार असो !*' *अशा घोषणा* सुरू करतात. आता पोलीस वैतागतात. रेटारेटी व शेवटी पोलिसांच्या लाठ्या हवेत फिरायला लागतात. गाड्यांचा ताफा सटकतो. त्यातील एक गाडी भरधाव वेगाने पुढे जाते. शाहसाहेब, राष्ट्रपती संजीव रेड्डींच्याबरोबर त्यात बसलेले असतात. इराणी विद्यार्थ्यांना पोलीस पकडून नेत आहेत असे पाहून २०–२५ पोरी त्यांच्याभोवती कडे करतात. पोलिसांची पंचाईत होते. एव्हाना गोंधळ सुरू होतो. पत्रकबाजीबरोबर शाहसाहेबांच्या पोर्ट्रेट्सवर माती फेकली जाते. लाठीमार सुरू होतो. सर्व पोरं रस्त्याच्या कडेने सुरक्षित जागा शोधत पळतात. जवळच असलेल्या मोहनसिंग मार्केटमध्ये पोरं घुसतात. फळांच्या गाड्या, टोपल्या अस्ताव्यस्त होतात. बराच मार खाल्ल्यानंतर १७ इराणी, ११२ भारतीय विद्यार्थ्यांना पोलीस पकडून नेतात. इराणच्या स्वातंत्र्यासाठी कॅनॉट पॅलेसवरील गोंधळ संपतो. तिकडे राष्ट्रपतिभवनात इराणचे शाह भारतास आर्थिक मदत देण्याच्या करारावर सह्या करतात.

## ३ फेब्रुवारी

कालच्या लाठीमार व अटकसत्रामुळे सर्व विद्यार्थ्यांमध्ये संतापाची प्रतिक्रिया उमटते. १०० विद्यार्थ्यांचा एक मोर्चा इराण दूतावासाकडे वळतो. ह्या मूठभर लोकांनासुद्धा पोलीस फार वाईट वागणूक देतात. शेवटी दगडफेक होतेच. *आपल्या देशाच्या राजासाठी सुशोभित* केलेला दूतावास काळ्या झेंड्यामुळे उगाच बेढब दिसतो. ह्या पोरांना उचलून पोलीस पकडून नेतात.

# स्फूर्तिस्थान

इराणी विद्यार्थ्यांशी बातचीत करीत असताना एक गोष्ट प्रामुख्याने जाणवली. सशस्त्र बंडखोरी केल्यामुळे शाह ऑफ इराण ह्यांची एकाधिकारशाही नष्ट होऊ शकेल असे इराणी विद्यार्थ्यांना वाटते; पण असे असले तरी इराणी जनतेच्या नागरी स्वातंत्र्यासाठी व ९० हजार राजकीय स्थानबद्धांच्या सुटकेसाठी लढणाऱ्या सर्वांनाच हा मार्ग योग्य वाटतो असे नाही. आम्ही इराणमध्ये अत्यंत शांततापूर्ण लढे संघटित केलेले आहेत; पण दुसरीकडे शाहासाहेबांच्या प्रमुख अधिकाऱ्यांना ज्यांनी क्रांतिकारकांना execute केले त्यांना मात्र आम्ही जिवंत ठेवीत नाही ! आम्हाला त्याशिवाय दुसरा मार्गच नाही; अशीही भूमिका काहीजण घेतात.

या विद्यार्थ्यांच्या साहसाची प्रशंसा करता येण्यासारखी आहे; पण प्रचंड हुकुमशहाशी टक्कर देण्याचे सामर्थ्य, स्फूर्ती ह्या क्रांतिकारकांना कोठून मिळते हे कोडे मला पडले होते. त्यामधील एकाला जेव्हा खोदून खोदून प्रश्न विचारला तेव्हा त्याने गोष्ट सांगितली. अत्यंत भावनाविवश होऊन त्याने काही छापील पत्रे व फोटो माझ्यासमोर टाकले.

'कॉमरेड मदर हे आमचे स्फूर्तिस्थान आहे.' त्याने सांगायला सुरुवात केली. '**फातीमा साईदी शामेगान** नावाच्या एका ५३ वर्षांच्या महिलेने काही वर्षांपूर्वी आम्हाला आदर्श घालून दिला. १९७३ साली **नादर शायेगान** नावाच्या एका क्रांतिकारकाला पोलिसांनी ठार मारले. त्या वेळेस आपल्या **अरजंग** व **नासेर** ह्या दोन लहान मुलांसह फातेमांनी गुरिल्ला संघटनेची सूत्रे हातात घेतली; पण 'कॉमरेड मदर'ला लगेच अटक करण्यात येऊन २० वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आली.

'कॉमरेड मदर'चा आजही छळ चालू आहे. कारागृहातसुद्धा ह्या 'मदरनी' उद्योग चालू केलेले आहेत. आज दोन्ही हात व एक पाय पोलिसांच्या छळामुळे निकामी झालेले असूनही 'मदर' आम्हाला स्फूर्ती देते आहे. १९७६ मध्ये मदर फातेमाची दोन्ही मुले शाहसाहेबांच्या पोलिसांशी झुंज देत असताना कामी आली. काही वर्षांपूर्वीच मदर फातेमाला अमेरिका व हॉपकिन्स विद्यापीठांनी फॅसिझम विरोधी कार्याबद्दल बहुमान दिलेला आहे.

त्या इराणी विद्यार्थ्यांनी जे साहित्य समोर फेकले त्यातील एक पत्र फारच बोलके होते. मदर फातेमाच्या १४ वर्षांच्या भावाने लिहिलेले ते पत्र.–

कॉमरेड मदर,

नमस्ते.

कारागृहातसुद्धा तू हालचाली करीत आहेस हे जेव्हा समजले तेव्हा मन आनंदाने भरून आले. शत्रू हा कधीही सामान्यांसाठी लढणाऱ्या, जहाल क्रांतिकारकाला बंद करू शकत नाही. जेव्हा जेव्हा आम्ही खचून जातो, निराश होतो तेव्हा तुझ्या चित्राकडे पाहिले की आमचे रक्त तापायला लागते आणि तू कारागृहातसुद्धा अशा अवस्थेत राजबंद्यांना एकत्रित करीत आहेस अशी बातमी जेव्हा आम्ही ऐकतो, तेव्हा आमच्यात एक नवा जोष संचार करतो.

कधीकधी मला प्रश्न पडतो की, तू आमच्या संघटनेच्या प्रगतीचा विचार करतेस की नाही ? कॉमरेड मदर, संघटनेची व्याप्ती आता बरीच झालेली आहे. गुरिल्ला ग्रुपची संख्या वाढली आहे. हुकुमशाहीला नेस्तनाबूत करण्यासाठी सशस्त्र बंडखोरीचा एकमेव मार्ग आता प्रत्येक ठिकाणी अंमलात आणला जात आहे. आधुनिक शस्त्रास्त्रांनी सज्ज असलेले शाहासाहेबांचे 'सावक' सुद्धा हतबल झालेले आहेत. तुला सर्व काही सांगून मोकळे व्हावे असे वाटतंय ग ! समुद्रावर उठणाऱ्या अक्षय लाटेप्रमाणे तुझे व्यक्तिमत्त्व ! तुझ्या डोळ्यांतील पेट घेणाऱ्या ज्वालांनी आजही क्रांतीची मशाल धगधगत ठेवलीय.

आमच्या कार्यात अडथळा आणणाऱ्या शाहसाहेबांच्या अनेक 'सावकांना' आम्ही वर धाडले आहे. सिया–कालच्या घटनेनंतर नूशीरवानपूर ह्या नावाखाली टेलिव्हिजनवरून आपल्याच एका सहकाऱ्याने शाहसाहेबांच्या बाजूने भाषण केले. त्याच्या ह्या कृत्याबद्दल...त्याच्या आत्म्यास शांती मिळो ! निक्–बाब ह्या अधिकाऱ्याला–ज्याने आम्हाला छळले होते त्याला– in the name of revolution वर पाठविले. आर्या मेहेर विद्यापीठात आपल्या सहकाऱ्यांना छळणाऱ्या सावकांचे कॅप्टन नवरोझी ह्यांना विद्यापीठाच्या आवारात ११ गोळ्या घालून वर पाठविण्यात आले.

मदर कॉमरेड, तर दुसरीकडे आपल्या असंख्य सहकाऱ्यांना वीरगती प्राप्त झाली आहे. कॉमरेड पारी ह्या मुलीने सावकांच्या हाती सापडण्याच्या आधीच हातात ग्रेनेड धरून आत्महत्या स्वीकारली. मदर, आम्ही सध्या अभ्यास करीत आहोत, संघटनेच्या वाढीसाठी हे आवश्यक आहे. जे जमेल ते आम्ही करीत आहोत. तू घालून दिलेला आदर्श आमच्या नजरेसमोर आहे. तू कारागृहात असलीस तरी आम्हाला स्फूर्ती मिळत आहे. आम्ही त्या सोनेरी दिवसाची वाट पहात आहोत. जेव्हा इराण स्वतंत्र होईल व तू मुक्त होऊन आम्हाला कवेत घेशील !

आपल्या विजयावर विश्वास व शाहांच्या हुकुमशाहीचा धिक्कार करून !

–तुझाच

शाहसाहेब महात्मा गांधींच्या समाधीस श्रद्धांजली वाहण्यास येणार हे पोरांना समजलेले असते. युवा जनताची काही पोरं तिकडे मोर्चा नेतात. आम्हाला महात्माजींचे दर्शन घेऊ द्या अशी त्यातील एक विद्यार्थी मागणी करीत असतो. पुन्हा काळे झेंडे फडकविले जातात. इराणी व भारतीय विद्यार्थ्यांची सुटका व्हावी अशा घोषणा देणाऱ्या पोरांना महात्मा गांधींच्या राजघाटावर उचलून नेले जाते.

ह्या सर्व निदर्शनांना घाबरून इराणच्या राणीसाहेब आपले कार्यक्रम रद्द करतात, तर तिकडे ११२ विद्यार्थ्यांना कोर्टात उभे केले जाते. त्यातील १७ इराणी विद्यार्थ्यांना वगळून सर्वांना मुक्त केले जाते; पण हे भारतीय विद्यार्थी 'आमच्या इराणी बांधवांना सोडल्याशिवाय आम्ही हटणार नाही!' असे म्हणून पुन्हा अटक करून घेतात. सर्वांच्या जामिनक्या रद्द होतात. सर्व विद्यार्थ्यांना तिहारच्या प्रसिद्ध कारागृहात पाठविण्यात येते.

### ४ फेब्रुवारी

सकाळीच तिहार जेलला जायचे ठरते. अर्थात असंख्य कारणांनी गाजलेला हा जेल पाहण्याची इच्छा होतीच. तर तिहार जेलला येतो. बरीच पोरंपोरी बाहेर असतात. जेम्स, उदय बाजेकर, जोशी, चंद्रप्पन ह्या पोरांशी भेटी होतात. We are enjoying असे ती आनंदाने पोरींना सांगत असतात, तर इराणचे विद्यार्थी आपण कोर्टात आपल्या स्थानबद्धतेविषयीच्या ledarilycr आव्हान दिल्याचे सांगतात. कोणी तरी त्यांना सांगते की, तारकुंडे ह्यांनी तुमची केस घेतली आहे. सर्व निश्वास टाकतात. एकूण तिहार जेल पाहणे होते.

### ५ फेब्रुवारी

पोरांना सोडलेले नसते. शिवाय इराणी विद्यार्थ्यांना त्यांना त्यांच्या देशात पाठविण्यात येणार असल्याची बातमी कळते. मृत्यूच्या नुसत्या भीतीने दिल्लीतील विद्यार्थी चवताळून उठतो. ६ तारखेला संप करण्याचा निर्धार होतो. दरम्यान मार्क्सवादी, दिल्ली जनता पक्ष, नागरी हक्क संघटना, विविध प्रतिष्ठित लोक सरकारने इराणी विद्यार्थ्यांना परदेशी पाठवू नये अशा प्रकारचे पत्रक काढतात.

### ६ फेब्रुवारी

१७ इराणी विद्यार्थ्यांचे जामीन रद्द झाल्याची बातमी आज सर्वत्र पसरलेली असते. सर्व महाविद्यालयांनी आज इराणी व भारतीय विद्यार्थ्यांच्या सुटकेसाठी संपावर जावे असे आवाहन युवा जनता, स्टूडंट्स फेडरेशन, फ्री थिंकर्स व इतरांनी केलेले असते. दोन्ही विद्यापीठे व अनेक कॉलेजस् बंद होतात.

दुपारी दोन वाजता सप्रू हाउसपासून मोर्चा निघतो. ७-८ श विद्यार्थी असतात. मुलींची संख्या जास्त असते. बहुसंख्य नेहरू विद्यापीठातील असतात. मोर्चा सुरू होतो. येणाऱ्या-जाणाऱ्या खाजगी गाड्या, बसेस, रिक्षा ह्यांना थांबवून पोरी पत्रकं वाटीत असतात. घोषणासुद्धा मजेशीर असतात. 'पेट्रो-डॉलर की सरकार- नही चलेगी नही चलेगी!' 'दमन हुवा छात्रों पे- तो खून बहेंगा सडकोंमें!' 'डाउन वुइथ यूएस इंपीरियालिझम्!' हळूहळू मोर्चा पंतप्रधान मोरारजी देसाईंच्या कचेरीकडे वळतो. आता मोर्चातील काही मार्क्सवादी पोरं 'लाल सलाम भाई लाल सलाम!' अशा घोषणा सुरू करतात. राष्ट्रपतिभवनाजवळ शेवटी मोर्चा येतो.

भाषणबाजी सुरू होते. विद्यार्थीपरिषदेला बोलू का दिले जात नाही म्हणून काही पोरं गोंधळ करतात. त्यांना बसविले जाते. एक शिष्टमंडळ पंतप्रधानांकडे पाठविले जाते. दरम्यान भाषणबाजी रंगते. एआयएसमची एक मुलगी मनजीत कौर 'आज आम्ही शांत असलो तरी उद्या आमच्या हातून बरेवाईट घडल्यास आम्ही जबाबदार नाही!' असे टाळीफेक डायलॉग मारून जाते. तेवढ्यात एक पोरगा उभा राहतो व म्हणतो, 'मला हे मान्य नाही. मी गांधीवादी आहे!' सर्वजण त्याची रेवडी उडवितात. अर्थात नंतर तो सुद्धा हसायला लागतो.

शिष्टमंडळ वापस येते व सांगते की, मोरारजीभाई आसामच्या दौऱ्यावर गेले आहेत. त्यांचे खास सचिव भेटले. ते म्हणतात की, साहेब ह्या गोष्टीपासून 'वाकीफ' आहेत. इराणी विद्यार्थ्यांना परदेशी धाडण्यात येऊ नये असे त्यांचे मत आहे; पण मी तुम्हाला काही सांगू शकत नाही.

हुर्रे हुर्रे म्हणून जमा झालेली पोरं पांगतात.

संध्याकाळी कोर्टाचा निकाल लागतो. सर्व पोरांना बिनशर्त सोडून दिलेले असते. १७ इराणी विद्यार्थीसुद्धा मुक्त होतात. गेले ४ दिवस पेटलेला असंतोष शांत होतो. शाहासाहेब आरामात पुन्हा इराणला परततात.

१७ इराणी विद्यार्थी सचिंत दिसत नाहीत.

२-३ वर्षांनी जेव्हा त्यांचे शिक्षण संपेल तेव्हा पुढे काय? वापस मायदेशी गेले की, शाहसाहेब त्यांचे 'स्वागत' करणारच!

स्वातंत्र्यासाठी मृत्यूला आव्हान देणारे हे विद्यार्थी क्रांतिकारक म्हणावयाचे का माथेफिरू अतिरेकी म्हणून त्यांच्याकडे दुर्लक्ष करावयाचे? दोन वर्षांचा इतिहास आपण इतक्या लवकर विसरलो की काय?

१९ मार्चला क्रांतिस्तंभाचा अनावरणसोहळा करावा अशी योजना आहे ..

# स्वप्न साकार होत आहे....

प्रा. झुंबरलाल कांबळे

एक मे १९७७ ला महाड चवदार तळे दलित मुक्ति क्रांतीचा नेत्रदीपक सुवर्णमहोत्सव सोहळा पार पडला. तोपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा व क्रांतिस्तंभ ज्या दगडी चौथऱ्यावर उभारला जात आहे तो चौथरा तयार झाला होता. पुतळाही तयार झाला होता. हा चौथरा एखाद्या व्यासपीठाप्रमाणे मुद्दाम Red stone मध्ये बांधला आहे. हा Red stone आग्ऱ्यावरून मागविला आहे. त्याला आग्रा–स्टोन असेही म्हणतात. आत सिमेंट-कॉंक्रिट व दगडाचे बांधकाम. त्याच्या भोवती शहाबादी फर्शी असावी तसा आग्रा स्टोन बसविला आहे. लाल रंगाचा, चौकोनी आकाराचा, एकाच साईझमध्ये कापलेला. आहे त्या मूळ स्वरूपातच. एकमेला पुतळ्याचे अनावरण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. वसंतदादा पाटील यांच्या हस्ते झाले.

नंतर लवकरच पावसाळा सुरू झाला. काम आहे त्या अवस्थेतच अर्धवट ठेवावे लागले. नोव्हेंबर १९७७ अखेरपर्यंत आता क्रांतिभूमीच्या आजूबाजूची भातखाचरे रिकामी झाली आहेत. डिसेंबरमध्ये कामाला परत सुरुवात केली आहे. १९ मार्चला क्रांतिस्तंभ अनावरण सोहळा साजरा करावा अशी सुवर्णमहोत्सव समितीचे अध्यक्ष श्री. घनःश्याम तळवटकर यांची योजना आहे. क्रांतिस्तंभाचे कॉन्ट्रॅक्टर सुप्रसिद्ध अहिय्या अँड कंपनीचे मालक. त्यांनी आपला कलावंतांचा संच पुन्हा महाडला आणला आहे.

## पवित्र अस्थी

२५ डिसेंबर १९२७ साली याच जागी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दुसरी परिषद आयोजित केली होती. तीच सत्याग्रह परिषद. ही जागा या परिषदेसाठी कशी मिळाली हा एक वेगळाच इतिहास आहे. २० मार्च १९२७ ला महाडात दंगल झाल्याने दुसऱ्या परिषदेस जागा देण्यास महाडकर तयार नव्हते. अशा बिकट प्रसंगी फत्तेखान देशमुख या मुस्लिम खोताने आपली शेतीची जागा सभेसाठी दिली. याच जागेवर मनुस्मृती या ग्रंथाची जाहीर होळी केली !! या प्रसंगाचा प्रतीकात्मक सुवर्णसोहळा २५ डिसेंबर १९७७ ला या क्रांतिभूमीवर सुवर्णमहोत्सव समितीतर्फे साजरा करण्यात आला.

हा कार्यक्रम अनेक दृष्टींनी वैशिष्ट्यपूर्ण होता. क्रांतिस्तंभाचे काम आता चौथऱ्यावर सुरू आहे. आर. सी. सी च्या स्तंभाभोवती प्रत्यक्ष दगडी कामाला सुरुवात झाली आहे. स्तंभाच्या अंतर्यामी अत्यंत महत्त्वाच्या काही वस्तू ठेवल्या आहेत. डॉ. बाबासाहेबांच्या जीवनकार्याचा संक्षिप्त इतिहास असणारा ताम्रपट व डॉ. बाबासाहेबांच्या पवित्र अस्थींचा करंडक श्री. घनःश्याम तळवटकर यांनी अत्यंत भावपूर्ण मनोवस्थेत आत ठेवला. त्यापूर्वी या पवित्र अस्थींचे दर्शन महाडकरांना घडावे म्हणून त्या चांदीच्या एका छोटयाशा, सुंदर व नक्षीदार करंडकात क्रांतिस्तंभाला लागूनच एका टेबलावर ठेवल्या होत्या. त्यांच्या शेजारी ताम्रपट व इतर पंचधातूंच्या वस्तूही होत्या. असंख्य महाडकरांनी व डॉ. बाबासाहेबांच्या अनुयायांनी अत्यंत मनोभावे या सर्व वस्तूंचे विशेषतः पवित्र अस्थींचे दर्शन घेतले. दर्शन घेताना एक विचार मनात रेंगाळत होता. डॉ. बाबासाहेब जिवंत असताना त्यांना पाहण्याचे भाग्य लाभले नाही. त्यांच्या पवित्र अस्थींचे दर्शन घडणे ही भाग्याची घटना ! माझ्याप्रमाणेच अनेकांच्या मनातही हाच विचार रेंगाळत असावा.

## मालाड स्टोन

स्तंभाच्या प्रत्यक्ष दगडी कामासाठी खास मालाड-स्टोन मागविलेला आहे. मुंबई-फोर्टमधील अनेक दगडी इमारती या मालाड स्टोनमध्येच बांधलेल्या आहेत. निसर्गतः फिकट पिवळा रंग, टणकपणा आणि हवा तो आकार धारण करण्याची क्षमता हे या स्टोनचे खास वैशिष्टय. क्रांतिभूमीवर दगडी काम करणाऱ्या कलावंतांचा तळ पडला आहे. ठिकठिकाणी मालाड-स्टोन अर्धवट घडलेले, पूर्ण घडलेले, मूळ स्वरूपातील स्टोन विखुरलेले आहेत. पिवळ्या रंगाचे, सारख्याच आकाराचे, त्यांच्या कपच्याही पडलेल्या आहेत. क्रांतिभूमीवर झाडांची सावली नाही. दिवसाकडे फिरविता येईल अशा एका पत्र्याची शेड पाठीमागे घेऊन कलावंत व्यग्रचित्ताने हातोडा, छिन्नी, टाकी, पिचर, गुण्या, ओळंबा, खडू, दोरी यांच्या साहाय्याने दगड घडवत आहेत, कोरीत आहेत. हातोडा छिन्नीच्या नादाने वातावरण निनादले आहे. तांबट गल्ली इथून जवळच आहे. भांडेघडईच्या ठोक्यांचे निनाद त्यात मिसळत आहेत.

## बौद्ध लेणी

क्रांतिभूमीवर उभे राहून पश्चिमेकडे पाहिल्यास गांधारपाले येथील प्राचीन बौद्ध लेण्यांच्या मालिकेचे दर्शन घडत आहे. डोंगराच्या उतारावर ओळीने असलेली लेण्यांची दारे. ती लेणी कोरणारे कलावंत कोण असतील ? दोन हजार वर्षांपूर्वीचे ते कलावंत कसे असतील ? त्यांची नावे काय असतील ? त्यांच्या हातोडा-छिन्नीनेही त्या काळी हे वातावरण असेच निनादले असेल काय ?

ज्या राजाने ती लेणी कोरून घेतली

त्याच्या नावाचा शिलालेख लेण्याच्या एका भिंतीवर कोरलेला आहे.

'पूर्णतेस पोहोचलेल्या राजा कंभोज विष्णुपलिताचे वास्तव्यस्थान असलेले लहान देऊळ आणि आठ गुंफा, वास्तव्यस्थानाच्या दोन्ही बाजूंकडील दोन कुंडे अर्पण केली. त्या कुमाराची (राजाची) ही स्तुत्य देणगी आहे.'

पण प्रत्यक्ष राबणाऱ्या कलावंताचे आयुष्य कसे असेल? शिलालेखामुळे व लेण्यामुळे तो राजा अमर झाला. अज्ञात कलावंतही अमर झाले; पण अज्ञातात राहून!

हा क्रांतिस्तंभही असाच टिकणार आहे. शंभर-दोनशे-तीनशे पाचशे-हजार, दोन हजार वर्षे!! हेही एक लेणेच नाही काय? हे लेणे घडविणारे राकट कलावंतही त्या कलावंतांप्रमाणे कालांतराने असेच काळाच्या उदरात गडप होणार आहेत; पण त्यांना तसे गडप होऊ द्यायचे नाही. तसे करणे अन्यायकारक ठरेल. म्हणून त्यांच्या मुलाखती घ्यावयाच्या आहेत.

### जाफरखान

हे जाफरखान. वय वर्षे पन्नास. मूळ कोकणातील देवगडचे. आजोबा मुंबईत स्थायीक झाले. जातीने मुसलमान; पण दगडी काम करवून घेणे, त्यासाठी मालाड-स्टोन पुरविणे, दगड कोरणारे कलावंत पुरविणे, त्यांच्यावर देखरेख करणे, तशा प्रकारचे गुत्ते घेणे हा यांचा पिढीजात धंदा.

आजोबा 'शापुर्जी पालनजी अँण्ड कंपनी' या विख्यात कन्स्ट्रक्शन कंपनीत मालाडस्टोन कॉन्ट्रॅक्टर म्हणून काम करीत. त्यांच्याकडे मालाडस्टोनच्या खाणी होत्या. फोर्टमधील रिझर्व बँक व बहुतेक दगडी इमारती आजोबांच्याच देखरेखीखाली तयार झाल्या.

आजोबांची ही परंपरा वडिलांनी चालविली. वडिलांचे नाव हासनखान. हे मोतीचंद अँण्ड कंपनीस स्टोन आर्टिस्ट सप्लाय करीत, त्यांच्यावर देखरेख करीत. त्यांच्याकडून कामे करून घेत. फिरोजशहा मेहता रोडवरील बॉम्बे म्युच्युअल इन्शुअरन्स, पंजाब नॅशनल बँक, रिझर्व बँक या भव्य दगडी इमारतींचे काम हासनखान यांनीच करून घेतले.

आपल्या वडिलांची परंपरा जाफरखान चालवीत आहेत. १९४३ नंतर वडिलांची जबाबदारी यांनी स्वीकारली. इंटर आर्टस्‌पर्यंत शिक्षण घेतले. मुंबईतील नवीन सचिवालयाचे दगडी काम, ओव्हरसीज कम्युनिकेशन बिल्डिंग ही कामे यांनीच करून घेतली. सध्या 'फंडामेंटल रिसर्च'च्या बिल्डिंगचे दगडी काम मुंबईत लहान भाऊ पाहतो व हे इथे क्रांतिस्तंभाचे काम पाहतात.

योगायोग असा की, पन्नास वर्षांपूर्वी महाडकरांचा विरोध बाजूला सारून एका मुस्लिम खोताने ही क्रांतिभूमीची जागा परिषदेसाठी बाबासाहेबांच्या अनुयायांना दिली. आज पन्नास वर्षांनंतर त्या जागेवर क्रांतिस्तंभ प्रत्यक्ष उभारण्याचे कामही एक मुस्लिमच करतो आहे!

त्या वेळी बापूसाहेब सहस्रबुद्धे या एका ब्राह्मणाने मनुस्मृति–दहनविधीत पुढाकार घेतला होता. आज पन्नास वर्षांनंतर क्रांतिस्तंभाचा संपूर्ण प्लॅन एका ब्राह्मण इंजिनिअरनेचा दिला आहे. हे इंजिनिअर म्हणजेच पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे इस्टेट ऑफिसर श्री. आर. एम्. कुलकर्णी हे होत. असा हा जुना ऋणानुबंध आहे.

हे संपूर्ण काम लाख–दीड लाख रुपये किमतीचे आहे. फक्त दगडी कामच पन्नास ते साठ हजार रुपयांपर्यंत जाईल, असे जाफरखान म्हणतात.

### स्तंभावरील ज्वाला

क्रांतिस्तंभाचे प्रमुख तीन भाग पडतील. त्याची उंची पन्नास फूट असून ते संपूर्ण काम आत आर. सी. सी. व बाहेरून स्टोन असे आहे. जोत्यावर सुरू होणाऱ्या स्तंभाचा दोन–तीन फुटांचा वर्तुळाकारी भाग Red Stone मध्ये असेल. तिथून दोन फूट उंचीवर मालाड-स्टोनमध्ये कंगोरा कोरला आहे. त्याच्यावर चार फूट उंचीचा वर्तुळाकार स्तंभ येईल. दोन फूट उंचीचा कंगोरा त्याच्यावर बांधल्यानंतर स्तंभाचा वर्तुळाकार पूर्ण होईल. जोत्यावरील आठ ते दहा फुटांचे दगडी काम कलाकौशल्याचे खोदकाम आहे.

तिथून वर उरलेला स्तंभ परत दोन भागात विभागता येईल. पहिला भाग चौकोनी. हा भाग सुमारे ३५ ते ३६ फुटांचा असेल. तो सारख्या आकाराच्या मालाडस्टोनमध्येच बांधला जाईल. त्याची घडाई व जुडाई अत्यंत वरच्या दर्जाची ठेवण्याचा कसोशीने प्रयत्न सुरू आहे.

त्यानंतर स्तंभाच्या ज्वालेचा प्रमुख भाग सुरू होईल. तो पाच ते सहा फूट उंचीचा असेल. इथे परत कलावंतांचे कौशल्य पणाला लागणार आहे. ही ज्वाला अखिल मानवजातीला अंधारातून प्रकाशाकडे नेणारे प्रतीक असेल. असंख्य दलितांच्या अज्ञानरूपी अंधःकाराला नष्ट करणाऱ्या प्रकाशाचे प्रतीक असेल. भगवान गौतम बुद्धाच्या शांतीसंदेशाचे ते प्रतीक असेल. ही संपूर्ण ज्वाला परत Red Stone मध्ये कोरली जाणार आहे.

या कामासाठी जो मालाड-स्टोन वापरला जात आहे त्याचा खाणीवर म्हणजेच जाग्यावरचा भाव १५ ते २० रुपये घनफूट एवढा आहे. अंतराबरहुकूम वाहतुकीमुळे त्याची किंमत वाढत जाते. घडईचे दर कलाकौशल्यावर अवलंबून असतात. साधी घडई असेल तर तिचा भाव ४० ते ५० रुपये घनफूट एवढा असतो. हा भाव १०० ते १५० रुपये घनफुटापर्यंत जाऊ शकतो. क्रांतिस्तंभाच्या घडईचे काम ७५ ते १०० रुपये घनफूट या हिशेबात चालू आहे.

### कलावंत

हे काम करण्यासाठी जाफरखान यांनी कलावंतांचा जो संच जमविला आहे तोही असाच कसलेला आहे. कलाकुसरीची कामे दगडावर कोरण्यात तरबेज व अनुभवी असलेला आहे. या कलावंतांचे तीन गट पाडलेले आहेत. अकुशल, निमकुशल आणि कुशल कलावंत. त्यांना रोज जेवण करून १५ ते २५ रुपये रोजगार मिळतो.

हे सर्व कलावंत वडार जातीचे भटके आहेत. एका गावाहून दुसऱ्या गावाला काम निघेल तिकडे, लहर लागेल तसे भटकत फिरणारे. कलावंतच ते! यातील काही चाळीस–पन्नास वर्षांपूर्वीपासून मुंबईत स्थाईक झालेले. तरीही मुंबतल्या मुंबईतसुद्धा एकाच ठिकाणी झोपडी बांधून न राहता ते निरनिराळ्या ठिकाणी झोपड्या बांधून राहणारे आहेत. सोलापूर–विजापूर हा त्यांचा मूळ विभाग. श्रावणबेळगोळ येथील बाहुबलीची प्रचंड मूर्ती घडविणारा अरिष्ठ-

नेमी कदाचित यांचाच वंशज नसेल कशावरून? भारतात, महाराष्ट्रात ठिकठिकाणी लेणी व त्यातील मूर्ती कोरणारे कलावंत यांचेच वंशज नसतील कशावरून?

हा अन्नाप्पा मरगू शिंगे. वय वर्षे पंचावन्न. आपल्याच धुंदीत आहे. दगड कोरताना याची समाधी लागली असावी. इतरांकडे मुळीच न पाहता, एकाग्रचित्ताने तो कामात व्यग्र आहे.

हा अरविंदे कोळा भांडेकर. वयवर्षे पंचेचाळीस. रोजगार २५ रुपये मिळतो. पूर्वजांपासून मुंबईत वास्तव्य.फोर्टमधील मफतलाल हाउसवर याने दगडी काम केले.भायखळचाच्या जैनमंदिराचे दगडी कोरीव काम केले. दगडावर कोरीव काम डिझाइनबरहुकूम करता येते. सुताराने लाकडावर कोरीव काम आपल्या सर्व कौशल्याने करावे तसे भांडेकर दगडाचे कोरीव काम करतो. गुजरातमध्ये बिलिमोरा इथे महादेवमंदिराचे कोरीव काम, तोरणे कोरण्याचे काम केले. मुंबई–गणेशपुरीत नित्यानंदस्वामींच्या मंदिराचे कोरीव काम, विशेषत: खिडक्यांचे कोरीव काम केले. कलकत्त्यात ज्यूटमिलने महादेवाचे एक प्रचंड आणि अतीव सुंदर मंदिर बांधले आहे. त्याच्या सज्जाखोदाईचे काम याने केले.

गुजरात व कलकत्त्यामधील मंदिरांची कामे कोट्यवधी रुपयांची आहेत. गुजरातमधील मंदिराचे काम वर्षानुवर्षे चाललेले असते. अशा ठिकाणी एकेक दगड कोरण्याचे काम दोन–दोन महिने चाललेले असते.

क्रांतिस्तंभाच्या दगडी कोरीव कामास एकेका दगडाने आतापर्यंत आठ–आठ दिवस घेतलेले आहेत. ज्वालेचा कोरीव भाग सुरू होईल तेव्हा त्यालाही एकेका दगडासाठी बरेच दिवस लागण्याची शक्यता आहे.

### कलावंतही दलितच

या सर्व कलावंतांचे मिळून एक वैशिष्टय जाणवते. सर्वजण समूहाने मुंबई–दिल्ली–कलकत्ता–मद्रास, गुजरात असे भटकत असतात. ते एकमेकांचे नातेवाईकच आहेत. सर्वांचा रंग एकजात काळा आहे. चेहरे राकट, बाहू दणकट आणि अंगापिंडाने मजबूत. चेहऱ्यावर दाढीचे खुंट. अंगावर धोतर– मळकट शर्ट. असलीच तर गांधी टोपी. उन्हापासून संरक्षण व्हावे म्हणून घातलेली. दारूची धुंदी आणि त्या धुंदीतच कामात धुंद राहण्याची सवय. वडारी भाषेबरोबरच मराठी भाषा बोलता येते.

जुन्या लोकांची नावे गाप्पा, येडाप्पा, चिमाप्पा अशी आहेत तर नवीन पिढीच्या तरुणांनी लोकप्रिय नटांची नावे धारण केलेली आहेत. इथे असलेल्या काही कलावंतांची नावे पुढीलप्रमाणे आहेत. अशोक भांडेकर, वसंत गुजरे, नारायण बनपट्टे, प्रल्हाद धोत्रे, मलाप्पा बनपट्टे, लक्ष्मण अलकुंटे, परशुराम भांडेकर, नागनाथ इटकर वगैरे.

या जातीत शिक्षणाचा म्हणावा तसा प्रचार झालेला नाही. थोडाबहुत मराठी शिक्षणाचा प्रचार झालेला आहे. म्हणजे ज्या महापुरुषाची स्मृती म्हणून हे स्मारक दलित-पीडित जनता आपल्या कष्टाच्या पै-पैशातून इथे उभारीत आहे, त्या महापुरुषाच्या अनुयायाशी या कलावंतांचे जवळचे नाते आहे. अगदी अतूट!

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हा महापुरुष ज्या अस्पृश्य जातीत जन्माला आला त्या अस्पृश्यांचीच एक शाखा हा स्तंभ घडवीत आहे. हजारो दलितांच्या आकांक्षेतील स्वप्न साकार करीत आहे. इतरांसाठी व स्वत:-साठीही!

□


चवदार तळे सत्याग्रह, मनुस्मृतिदहन या घटनांची सविस्तर माहिती

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक

प्रा. रा. म. बिवलकर । प्रा. झुंबरलाल कांबळे

किमत वीस रुपये

प्रस्तावना : प्रा. नरहर कुरुंदकर

पुरस्कार : श्री. भय्यासाहेब आंबेडकर

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ । नागनाथ पाराजवळ । पुणे ३०

कथा

# काउंटिंग

## दिलीप निंबाळकर

### दि. ७-१०-७६

'वरंगळ पिरिअड' पूर्ण करून आल्यास आज तीन महिने पूर्ण झाले. तीन महिन्यांनंतर आता कुठे आराखडा तयार झाला आहे. हा रिजन तसा लहानच आहे; पण निर्मलदत्ताला पसंत पडेल असा बारीकसारीक तपशिलासह आराखडा तयार करणं, हे काही सोपं काम नाही.

पिरिअड चालू होता तेव्हा खरं तर निर्मलदत्ताचा या छोट्या छोट्या तपशिलाच्या आग्रहाबाबत रागच येत असे; पण आता त्याचं महत्त्व कळत आहे. आज या रिजनमधील काउंटिंग रिपोर्ट तयार झाला आहे. आज हा रिपोर्ट वर पाठवलाच पाहिजे.

### दि. ८-१०-७६

रिपोर्ट डिस्पॅच केला. आता या दोन-तीन दिवसांत या रिजनमध्ये आणखी एकदा राउंड पुरा केला पाहिजे. नाही तर हे जिवंत मुडदे आयत्या वेळी पळ काढण्यास कमी करणार नाहीत. शक्यता फार कमीच अशी. फळं चांगली पिकवली आहेत. एकही वाया जाणार नाही. या तीन महिन्यांत सर्वांना तयार करता करता नाकी दम आला आहे खरा; पण त्याचबरोबर मालही पक्का तयार झाल्याचं समाधान आहेच. विशेषत: रघुनाथचं कौतुक करावं तेवढं थोडंच आहे.

पदवीधर होईपर्यंतची चार वर्षं, रघुनाथ कोण अन् प्रताप कोणता हे लोकांना सांगावं लागण्याइतपत सतत एकत्र होतो. मात्र लॉच्या अभ्यासासाठी पुण्याला आलो अन् कसे, केव्हा दुरावलो हेच कळलं नाही. आज तरी तो या शहरातला एक नाणावलेला वकील आहे. भरपूर पैसा ओढतो आहे.

पण उद्याचे काय? आता रघुनाथला उद्याची काळजी नाही की कालची खंत नाही. या दोन-तीन महिन्यांत त्याने प्रॅक्टिस हळूहळू बंदच करीत आणली आहे. या अवधीत माझ्यापेक्षा किंचित का होईना,सरसच त्याची तयारी झाली आहे. एवढा सुखविलासात गुरफटलेला हा माणूस. हे सारं सुख सोडून या मार्गात येईलसं वाटलं नव्हतं कधीच.

### दि. १३-१०-७६

काउंटिंग रिपोर्ट ॲप्रुव्ह होऊन आला आहे. पण...

पण लिस्टमध्ये पहिलंच नाव आहे, श्री. श्रीरंगराव नगरकर. माझ्या कामाची सुरुवातच इथून होईल, असं कधीच वाटलं नव्हतं. विलक्षण दैवगती आहे खरी. प्रत्यक्ष जन्मदात्यापासून काउंटिंगला सुरुवात करायची यापेक्षा कठोर कसोटी ती कोणती?

या मार्गात प्रवेश करतानाच निर्मलदत्ताने या सर्व प्रकाराची पुन:पुन्हा जाणीव करून दिली होती. काउंटिंग म्हणजे—अक्षरश: शिरगणती—शिर तोडून त्या मुंडक्यांची गणती करावयाची—हा काउंटिंगचा अर्थ त्या वेळी स्वीकारताना एकदाच मन शहारलं होतं; पण ज्या ध्येयासाठी हे काउंटिंग करायचं त्या ध्येयप्राप्तीसाठी हे अपरिहार्यच असल्याची समजूतही पटली होती, तशी खात्री झाली होती. त्यामुळेच या मार्गातले काउंटिंगसारखेच इतरही भयप्रद प्रकार पाहूनही मी इथेच कायम राहण्याचं ठरविलं होतं. वरंगळ पिरिअडमध्ये असताना प्रॅक्टिकल म्हणून एका राउंडमध्ये निर्मलदत्ताबरोबर गेलो असताना हे काउंटिंग पाहिलं होतं. हेच काम आज ना उद्या आपल्यालाही करायचं आहे, याची जाणीव होती; पण माझ्या कामाची सुरुवातच जन्मदात्या बापाचे काउंटिंग करून होईल, असं कल्पनेतही कधी वाटलं नव्हतं. त्यामुळेच आज विचाराने माझं मस्तकच फुटण्याची वेळ आली आहे.

नियमाप्रमाणे या रिजनमध्ये मी दोनदा काउंटिंग राउंड पुरा केल्यानंतर हा भाग सोडणार होतो. अर्थातच बाबांच्या काउंटिंगच्या वेळेस हे काम दुसऱ्या कोणावर तरी सोपवलं गेलं असतं. म्हणूनच मी लिस्टमध्ये बाबांचं नाव टाकण्यास कचरलो नव्हतो; पण आजच्या लिस्टमध्ये बाबांचंच नाव पहिलं आलं आहे. माझ्या कामाची सुरुवात येथूनच व्हायची हा संकेत माझ्या नशिबी असावा ना?

### दि. १६-१०-७६

परवाच्या दिवशी काउंटिंगवर जायचं आहे. त्याच एका विचारात रात्रभर झोप आली नाही. 'प्रसंगी रक्ताची नाती ध्येयप्राप्तीसाठी त्या रक्ताच्याच नात्यात न्हाऊन तोडून टाकीन', ही शपथ वरंगळ पिरियडमध्ये घेताना नेमका असाच प्रसंग स्वत:वर येईल असं स्वप्नातही वाटलं नव्हतं. त्यामुळेच आज अजूनही मला आत्मविश्वास गमावल्यासारखं वाटतं आहे. परवा रात्री काउंटिंगवर जायचं आहे; पण आजपासूनच घरातला आक्रोश—विशेषत: आईचा, माझ्या कानावर आदळतो आहे. डोळ्यांपुढे हे केवळ कल्पनाचित्र येताच मी मनातून हादरतो आहे.

पण छे! असा माझा तोल जात कामा नये. माझा स्वत:वरचाही विश्वास उडावा इतका मी दुबळा होऊन चालणार नाही. या प्रसंगी मी सावरलो तरच मी कायमचा सावरेन. माझ्या घरात होणारा तो आक्रोश आजच माझ्या कानांवर का यावा? अन् त्याच घरातल्या गोडाउनमध्ये अस्मान फाडणाऱ्या किंकाळ्यांनीही, चार वर्षांपूर्वीच माझ्या कानांचे दडे का बसले नव्हते?

विश्याने केवळ साल अर्धवट सोडून गुपचुप पळ काढला होता म्हणून बाबांनी त्याचा शोध लावून गोडाउनमध्ये चाबकाने त्याच्या पाठीची सालटी लोंबवली होती. स्पेशल खिळ्याच्या बुटांनी त्याच्या डोक्याची खरली काढतानाही बाबांच्या शिव्यांत त्याचं

किंचाळणं लपून जात होतं. गोठल्या रक्ताने–मनाने मीही तिथेच हजर होतो. काहीही करू शकत नव्हतो. कारण हे प्रकार नवीन नव्हते. अशाच एका प्रसंगी मी काही बोलण्याचा प्रयत्न केला असता ' मला पुस्तकी शहाणपणा शिकवू नको ! ' म्हणून बाबांनी माझंही थोबाड रंगवलं होतं. मी तरी जास्त काय बोलणार ? माझी कॉलेज-मधली चैनचंगळ त्यांच्याच पैशावर नव्हती का चालली ? तरी देखील राहून राहून खंत होतीच की, विश्याचेच शेत थोडक्याशा कर्जापोटी ताब्यात घेऊन त्यात त्यालाच गुरासारखे राबवून घेण्यात बाबांचे...

## दि. १५–१०–७६

अनिच्छेनेच बहुतेक संकेत पार पाडायचे, हाच एकमेव या मार्गातला कायमचा संकेत आहे. मीच जर या प्रसंगी मागे फिरलो तर इतरांचं काय ? त्यांना, आता कोणत्या तोंडाने मी या मार्गापासून परावृत्त करणार आहे ? मला आता मागे फिरणं अशक्य आहे.

साम्यवादाकडे जाणाऱ्या या नक्षलवादी मार्गापासून आता मला दूर होता येणारच नाही आणि माझी तशी इच्छाही नाही. हा मार्ग चुकीचा आहे की बरोबर, हा विचारच मी गेल्या चार वर्षांत पुसून टाकला आहे. तसं तर साम्यवाद म्हणजे नेमकं काय, हे मला तरी अजून पुरेसं कुठं कळलं आहे ? पण तरी देखील मी ज्या मार्गाने जातो आहे त्यामुळे निदान कष्ट करणाऱ्या हातास त्याची स्वतःची अशी थोडी का होईना जमीन मिळते आहे, मोठ्या बागाईतदारांकडे-जमीनदारांकडे साचलेली संपत्ती केवळ तिजोरीमध्ये पडून राहण्यापेक्षा कुणा गोर-गरिबांच्या हाती-मुखी पडते आहे, हे काय कमी आहे ? नक्षलवादाच्या या हिंसक मार्गाने का होईना, या ' ब्लॉक कॅपिटल 'चे बांध फुटून तृषितांचो तहान आज तरी भागते आहे, याचं मला समाधान आहे. केवळ मला एकट्यालाच समाधान आहे असं नव्हे. या मार्गात आलेल्या सर्वांनाच. म्हणूनच किती काळ याचे परिणाम टिकणार आहेत, किती वेळपर्यंत हे आमचे सद्हेतू टिकाव धरणार आहेत, याची कुणालाच शाश्वती नाही; पण जिथे आम्ही स्वतःच्या जिवाचीच शाश्वती गृहीत धरलेली नाही तिथे अशा अमूर्त कल्पनांचं काय ? तिकडे शहरातून या मार्गावर उलटसुलट टीका-स्तुतिसमर्थनाचा वर्षाव होत आहे–परिसंवाद होताहेत–वर्तमानपत्रं रंगताहेत, या सर्वांची दखल घेण्यासाठी आज आम्हाला फुरसतही नाही, ती केवळ यामुळेच. अराजकवादी–लोकशाहीचे मारेकरी हा टिळा तर आमच्या भाळी कायमचाच ठसला आहे. मग आम्ही तरी याचा त्याग का करावा ? भले तिकडे राज्यशास्त्राचे–समाजशास्त्राचे प्रगाढ पंडित पुस्तकी उलाढाल करोत. आम्ही जिवंत माणसांच्याच उलाढाली करणार. कुठे तरी चुकतं आहे. कॉलेजच्या स्वप्ननगरीत फारच थोडे दिवस ही खंत माझ्यासोबत राहिली.


' लॉ'च्या अभ्यासाला इतर बागाईतदारांच्या पोरांप्रमाणेच पैसा उडवण्याचा एक मार्ग–म्हणून पुण्यास आलो. संध्याकाळचे ' डेक्कन परिअडस् ' न चुकता अटेंड करू लागलो. अन् अशाच एका वेळी निर्मलदत्ताची गाठ पडली. पुढे रूमपार्टनर म्हणून त्याच्याशी आलेला संबंध आजपर्यंतच्या सहकाऱ्याच्या नात्यापर्यंत दृढ झाला. हा बंगाली बाबू मोठी मोठी पुस्तकं वाचायचा खरं. कुतूहल म्हणून सहज एके दिवशी पाहिली ती अन् आश्चर्यचकित झालो. लॉच्या पहिल्या वर्षात तो मार्क्सवाद–दास कॅपिटल–इत्यादी ग्रंथांचं, आजपर्यंत मी ज्यांची नावंच ऐकली होती अशा ग्रंथांचं, पठण करीत होता. जन्माने मुंबईकर असणारा–आजपर्यंतचे शिक्षण पाटण्याला झालेला हा भटका बाबुमोशाय नक्षलवादावर विश्वास ठेवणारा आहे, हे समजायलाच मुळी मला वर्ष–दीड वर्ष लागलं अन् जेव्हा मला हे समजलं तेव्हा मीच या मार्गात इतका गुरफटलो होतो की, आता यातून बाहेर पडण्याची मला लाज वाटत होती. नक्षलवादी पंथात सर्वांत मोठा मानला जाणारा दुर्गुण–व्यक्तिपूजा–निष्ठा. मी मात्र निर्मलदत्ताबाबत तो जाणीवपूर्वक जोपासला होता. त्याचा विश्वास मिळवणे ही मला आज तरी सर्वांत मोठी कमाई वाटते आहे. त्यामुळेच परवाच्या काउंटिंगमध्ये सामील होऊन माझीदेखील या मार्गावर त्याच्याइतकीच निष्ठा आहे, हे दाखविण्याची संधी मी सोडणार नाही.

ज्या तळमळीने निर्मलदत्त या नक्षलवादी पंथावर दृढ विश्वास ठेवून रात्रंदिवस काम करत आहे, त्याला तोड नाही. साम्यवादा-कडे जाणारा हा मार्ग त्याच्या नसानसांत भिनला आहे. त्याच्या या झोकून देण्याच्या प्रवृत्तीवर आणि प्रभावी बोलण्यावर आसक्त होऊनच गेली दोन-तीन वर्षं मी घरदार आणि कॉलेज सोडून त्याच्याबरोबर हिंडतो आहे. या कालावधीत मी काय पाहिलं नाही ? त्याच्याबरोबर वरंगळच्या जंगलात या मार्गाचा खोल अभ्यास करताना–प्रॅक्टिकल करताना–जमीनदारांच्या आणि भांडवल-दारांच्या नागड्या–उघड्या अन्यायाचं विदारक चित्र पाहिलं. आंध्रातल्या त्या जमीनदाराचा–ज्याने स्वतःच्या मजुरांच्या नावावर भूदान यज्ञात जमिनी कागदोपत्री करून घेतल्या आणि त्या मजुरांच्या बायका-मुलींदेखील स्वतःचीच मालमत्ता जमजून उपभोगल्या त्या जमीनदाराचा, निर्मल-दत्ताच्या रूपाने मृत्यू पुढे ठाकल्यानंतरचा प्राणांतिक आक्रोशही ऐकला. बिहारमधल्या पुराचा फायदा घेऊन केवळ स्वतःच्या ताब्यात राहण्यास नकार देणाऱ्या मजुरांच्या झोपड्या वाहून जाव्यात म्हणून भरल्या तळ्याचे बांध फोडणाराही जमीनदार पाहिला.

या असल्या प्रसंगांतूनच बलिष्ठ–अन्यायी जमीनदारांविरुद्धची चीड तीव्रच होत गेली. त्याचबरोबर या मार्गावरील निष्ठाही. माझ्या या निष्ठेवर विश्वास ठेवूनच माझ्या हाती हा राउंड दिला गेला आहे. निर्मल-दत्ताचा हा विश्वास मला दृढ केला पाहिजे. काहीही होवो, माझं हे पहिलंच काउंटिंग यशस्वी झालं पाहिजे.

## दि. १९–१०–७६ (दैनिक समाचार)

श्रीरामपूर : काल रात्री येथील एक प्रसिद्ध बागाईतदार श्री. श्रीरंगराव नगरकर यांच्या वस्तीवर नक्षलवाद्यांचा सशस्त्र हल्ला होऊन त्यात स्वतः श्रीरंगराव नगरकर हे मारले गेले आहेत. घरातील इतर कोणासही कोणत्याही प्रकारची मारहाण झालेली नाही व मालमत्तेची लूटही झालेली नाही. या घटनेत नक्षलवादी नेते श्री. प्रताप नगरकर हेदेखील प्रत्युत्तराच्या गोळीबारात ठार झाले आहेत. त्यांचे सहकारी शहरातील प्रसिद्ध अॅड्व्होकेट श्री. रघुनाथ देशमुख हे फरारी आहेत. पोलीस तपास चालू आहे. प्रताप नगरकर हे श्रीरंगराव नगरकर यांचेच ज्येष्ठ चिरंजीव असल्याचे कळते. ☐



# तुम्हाला नशीबवान बनायचंय...?

डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर

काही लोक बेटे भलतेच भाग्यवान असतात. त्यांना नोकरी मनासारखी मिळते, बायको त्यांनी सांगितलेले सारे काही ऐकते. ऑफिसात सहकारी काय, साहेब सुद्धा त्यांच्याशी भांडत नाहीत. याउलट आमचा वैताग पहा. प्रत्येक ठिकाणी आमची पार तंतरते. आम्ही नेमके कोणत्या नक्षत्रावर जन्माला आलो होतो कुणास ठाऊक...?

—थोडक्यात आपल्या मते काही लोक नशीबवान असतात. काही कमनशिबी असतात.

—आणि विज्ञानाला नेमके हे मंजूर नाही. विज्ञान म्हणते काही लोक हसतमुख आणि समाधानी असतात. काही लोक चिडचिड करणारे आणि वैतागलेले असतात. हा स्वभाव तेवढा खरा. हा स्वभाव सहजपणे बदलविता येतो हे पण तितकेच खरे. नशीब नावाची काही गोष्ट तशी अस्तित्वात नसते. असली तर सर्वांच्या वाट्याला ती जवळजवळ सारखीच येते. काही चांगल्या आणि काही वाईट गोष्टी नकळत प्रत्येकाच्याच आयुष्यात येतात. प्रत्येकाच्या आयुष्यात त्यांचा क्रम थोडा बदलतो इतकेच...विज्ञानाचे राहू द्यात 'दैवं पंचमम्' म्हणून सांगणाऱ्या गीतेने सुद्धा नशिबाला वीस टक्क्यांहून अधिक महत्त्व दिलेले नाही!

हे सारे सांगावयास आणि ऐकावयास तसे ठीक आहे; पण आयुष्यात काही लोक यशस्वी ठरतात, काही जाम अयशस्वी ठरतात. हे सारे असे का होते? एकाच लायकीचे, एकाच कुवतीचे लोक समाजात वावरत असतात. त्यांपैकी एक जण खूप यश घेऊन बाहेर पडतो. दुसरा अपयशाचा धनी होतो. विज्ञान म्हणते, याचा नशिबाशी काही संबंध नाही. हे तुम्ही सहजपणे बदलू शकता. त्याचे एक शास्त्र आहे. ते तुम्ही शिकत नाही. हे शास्त्र न शिकलेला माणूस अयशस्वी होतो. समजा, अगदी सारखीच हुशार असलेली आणि सारखाच अभ्यास केलेली दोन मुले परीक्षेला बसली; पण त्या वेळी एकाने प्रश्नपत्रिका कशी सोडवायची या तंत्राचा तेवढा अभ्यास केलेला नाही—तो मुलगा हमखासपणे कमी मार्क मिळवील. कदाचित् नापाससुद्धा होईल. तुम्हाला काय माहीत आहे त्यापेक्षा, ते कोठे व किती वापरावयाचे याचे ज्ञान परीक्षेत आवश्यक असते.

प्रश्नपत्रिका कशी सोडवावयाची, याचा सराव परीक्षेला आवश्यक असतो, हे आपण मान्य करतो. —पण जगात वावरताना हे असले काही ज्ञान लागते हे आपण सहजपणे विसरून जातो. त्याचा अभ्यास वगैरे करणे तर बाजूलाच राहते. पूर्वीच्या काळी साध्या भाषेत आपण त्याला 'व्यवहारज्ञान' म्हणत असू. मुलगा हे ज्ञान कळत—नकळत आई-वडिलांच्याकडून शिकत असे. पूर्वीच्या काळी संथ, शांत, चाकोरीतल्या जीवनात हे येवढे ज्ञान पुरेसे होते. आज विज्ञानाने सारा जमानाच उलटापालटा करून टाकलाय. एका गतिमान अस्थिर चक्रात तुम्ही फेकले गेलाय. प्रत्येक क्षणी येथे एक नवी परीक्षा असते. नवे नवे प्रश्न झपाट्याने तुमच्या पुढे येतात. महत्त्वाचे म्हणजे तुमच्या आई-वडिलांनी सोडवलेले चाकोरीतील प्रश्न आणि हे प्रश्न मूलतःच भिन्न असतात. हे प्रश्न सोडविण्याची नवी दृष्टी आणि नवी हिंमत तुमच्याजवळ असावी लागते.

प्रश्न. प्रश्न. प्रश्न. प्रश्नांची एक अखंड मालिका तुमच्या समोर येऊन उभी राहते. हे प्रश्न जणू तुम्हाला घेराव करून उभे असतात. प्रश्नांच्या चक्रव्यूहात तुम्ही शिरता आणि हे प्रश्न कसे सोडवावयाचे, याचे ज्ञान ज्यांना असते. जे लोक ही विद्या शिकलेले असतात ते लोक यशस्वी होतात. थोडक्यात प्रश्न अक्कलहुशारीने सोडविण्याचे काही 'तरिके' असतात. विज्ञानाने त्याचेही एक शास्त्र बनविले आहे. प्रोफेसर डॉक्टर मोशे रुबिनस्टीन ( Moshe Rubinstein ) यांनी या शास्त्राचा खूप अभ्यास केलाय. लोकांना या अशा प्रश्न सोडविण्याचे ज्ञान देणाऱ्या शाळा चालविल्यात पंचतंत्रातील राजाची खुद्द मुले जशी गुरुगृही राहून बेरकी बनली, तसे अनेकजण यांच्या सहवासात राहून नशीबवान बनलेत. या सर्व ज्ञानावर आधारित पंचतंत्राप्रमाणेच त्यांनी एक पुस्तक लिहिलंय. त्यांच्या पुस्तकाचे नाव 'पॅटर्न्स ऑफ प्रॉब्लेम सॉल्व्हिंग' ( Patterns of Problem Solving ), त्यात त्यांनी यशस्वी माणसे प्रश्न सोडविताना कोणत्या गोष्टी करतात, याचे काही गुरुमंत्र सांगितलेत. त्यांच्या मते कोणताही प्रश्न सोडविताना खालील दहा गोष्टी खऱ्या महत्त्वाच्या.

### तुमच्या प्रश्नालाच तुम्ही प्रश्न विचारा

म्हणजे असे, तुम्हाला पटो न पटो भाषा ही जगातील सर्वांत मोठी शक्ती आहे. तुमच्या प्रश्नालाच जेव्हा तुम्ही प्रश्न विचारता त्या वेळी नकळत तुमच्या प्रश्नाची तुम्ही नव्याने पुनर्रचना करीत असता आणि ही अशी पुनर्रचना करताना तुम्हाला अवघड वाटणारा प्रश्न अगदी अकल्पितपणे सहजपणे सुटूनही जातो. 'बॅबिलॉन' या अतिप्राचीन संस्कृतीमधील राजा हमुरबाईचे उदाहरण

घ्या. राजधानीत पाण्याची प्रचंड टंचाई निर्माण झाली होती. गावापासून नदी तर पंधरा-वीस मैल अंतरावर होती. लोकांना पाण्यापर्यंत कसे न्यावयाचे वा राजधानीच पाण्यापर्यंत कशी हलवावयाची, या प्रश्नावर जंगी चर्चा सुरू होत्या. राजा म्हणाला, 'लोकांना पाण्यापर्यंत कसे न्यावयाचे हा खरा प्रश्न नाही. पाणी लोकांच्यापर्यंत कसे आणावयाचे हा खरा प्रश्न आहे.' प्रश्नाच्या या नव्या मांडणीमधून मानवी इतिहासातील पहिला कालवा जन्माला आला. आज ही गोष्ट आपल्या इतकी अंगवळणी पडली आहे की, यात आपणाला काही नवे वाटतच नाही. हमुराबाईने काही नवे प्रश्न विचारले आणि आपल्या प्रश्नाचीच नव्या प्रकारे रचना केली,असेही वाटत नाही; पण नदीला कालवा खोदून पाणी आणता येते, ही अखेर हमिराबाईने मानवी संस्कृतीला दिलेली देणगी ठरते. हमिराबाईच्या डोंगरावर उभे असल्याने आपणाला तिची उंची जाणवत नाही इतकेच.

हे उदाहरण तुम्हाला पटत नसेल तर दुसरे एक उदाहरण घ्या. ही एका सैनिकाची गोष्ट आहे. त्याला सिगरेट ओढण्याचे जाम व्यसन होते. रविवारी जेव्हा सैनिकांची प्रार्थना सुरू असते तेवढा एक तास त्याला सिगरेट ओढण्याची परवानगी नव्हती. सैन्यातील धर्मगुरूने सांगितले, 'जा पोपची परवानगी आण. तरच तुला प्रार्थना सुरु असताना सिगरेटस् ओढावयास देतो!' आता पोप प्रार्थनेच्या एका तासात सिगरेट ओढावयास देण्याची मुळीच शक्यता नव्हती; पण त्या सैनिकाने पोपला मुळी प्रार्थना सुरू असताना सिगरेट ओढलेली चालेल का,म्हणून विचारलेच नाही. त्याने उलट पोपला विचारले, 'अगदो तोंडात सिगरेट असतानाही परमेश्वराचे नाव घेऊन त्याचे स्मरण करून चालेल का?' पोपने अर्थातच हो म्हणून कळविले. प्रश्नाच्या या जरा वेगळ्या केलेल्या मांडणीत त्या सैनिकाचा प्रश्न अगदी सहजपणे सुटला.

## २. तुमच्या समोर असलेल्या प्रश्नांची अग्रक्रमाने मांडणी करा.

त्यांच्या योग्यतेच्या प्रमाणात त्यांना तुमचा वेळ द्या : म्हणजे असे, तुमचे सबंध गेले वर्ष नजरेसमोर आणा. गेल्या सबंध वर्षातील तुम्हाला आनंद व्हावा वा मनस्ताप व्हावा, असे चार-पाचच प्रसंग तुम्हाला आठवतील. याउलट तुमचा गेला आठवडा तुम्ही नजरेसमोर आणा. ज्यामुळे तुम्ही अस्वस्थ झाला होता असे सात-आठ प्रसंग तुम्हाला आठवतील. त्यात साहेबाशी आणि बायकोशी झालेले भांडण असेल, चुकलेली लोकल असेल, मित्रांनी तुम्हाला कसे गंडवले ते असेल. एक ना दोन. असल्या अनेक फालतू गोष्टी असतील. या असल्या तत्कालीन फालतू गोष्टींवर विचार करीत आपल्या वेळेचा अपव्यय करू नका. थोडक्यात थोडे 'निगरगट्ट' बना! एक महत्त्वाचे सूत्र लक्षात ठेवा. तुमच्या समोर असलेल्या शंभर प्रश्नांपैकी किमान पन्नास प्रश्न फालतू असतात. उरलेल्या पन्नास प्रश्नांपैकी पंचवीस प्रश्न आपोआप काही वेळाने सुटतात. दहा प्रश्न उद्याच्या बदलत्या संदर्भात प्रश्नच उरत नाहीत. उरलेल्या पंधरांपैकी पाच प्रश्न तुम्ही प्रयत्न केलात तर सहजपणे सुटतात. पाच प्रश्न अजिबात सुटण्यासारखे नसतात. त्यांच्यावर विचार करणे सोडून दिले तरच ते सुटतात. उरलेले पाच प्रश्न मात्र महत्त्वाचे असतात. या प्रश्नांचा साकल्याने विचार करून त्यांच्यावर तुमची सारी ताकद लावणे महत्त्वाचे असते. तो प्रश्न समजावून घेण्यासाठी खूप वेळ घालविण्याची आणि त्याचे उत्तर शोधून त्यावर वारेमाप मेहनत करण्याची जरुरी असते. आपल्याला बालवयात पडलेल्या अनेक प्रश्नांपैकी सापेक्षवादाचा सिद्धान्तच निवडून त्यावर आपल्या मनात वीस वर्षांहून अधिक काळ विचार करणारा आइनस्टाइनच शेवटी जगाला एक मोलाचा नवा सिद्धान्त देऊ शकतो. त्याने केलेली प्रश्नाची निवड आणि त्यावर त्याने घालविलेला वेळ या दोन्ही गोष्टी महत्त्वाच्या आहेत. भांडवलशाहीवरचा आपला जगप्रसिद्ध ग्रंथ लिहिणाऱ्या ॲडॅम स्मिथ याने पंचवीस वर्षांहून अधिक काळ आपल्या या पुस्तकावर वाचन आणि चिंतन केले होते. या लोकांचे राहू द्यात. नोकरीत आपण मागे पडतो, म्हणून खंत करणाऱ्या आणि त्यामुळे साहेबाला आणि प्रांतीयतेला शिव्या घालत आपल्या वेळेचा 'सदुपयोग' करणाऱ्या एखाद्या मराठी तरुणाने हे थांबवून एक दोन वर्षे सक्त मेहनत घेऊन आपले इंग्रजी सुधारले तर आपल्या नोकरीतले अनेक प्रश्न तो सहजपणे सोडवील.

## ३. तुमच्या उत्तरालाच प्रश्न विचारा

प्रश्नाचे उत्तर देणे नेहमीच तसे सोपे वाटते; पण तो मोह आपण टाळला पाहिजे. 'उचलली जीभ लावली टाळ्याला' हा प्रकार फार भयावह असतो. नाही तर होते काय, तुम्ही आगीतून सुटून फोफाट्यात पडता एक प्रश्न सोडविताना तुम्ही नकळत चार नवे प्रश्न निर्माण करता. नव्या प्रश्नांच्या जाळ्यात तुम्ही गुंतून पडता. हुशार माणूस ज्या परिस्थितीतून अक्कलहुशारीने बाहेर पडतो त्या परिस्थितीत आपण सापडणारच नाही, याची शहाणा माणूस काळजी घेतो, हे सर्वांनी खरे आहे. तुमच्या समोरचे आजचे अनेक बिकट प्रश्न काल तुम्ही दिलेल्या घाईगर्दीच्या उत्तरांतून निर्माण झालेले असतात. उद्या पुन्हा असेच काही घडू नये, असे वाटत असेल तर आजचे तुमचे उत्तर लगेच सांगण्यापेक्षा व ते लगेच अमलात आणण्यापेक्षा त्यावर भरपूर विचार करणे महत्त्वाचे आहे. तुमच्या उत्तरालाच तुम्ही अनेक प्रश्न विचारले पाहिजेत.

## ४. थोडे अश्रद्ध बना, थोडे बंडखोर बना

चाकोरीबाहेरचा विचार करणे हाच तुमच्या समोरचा अवघड प्रश्न सोडविण्याचा अनेकदा खरा मार्ग असतो. मानवाच्या जन्माचे रहस्य उलगडावयास निघालेल्या डार्विनने बायबलचा रस्ता झुगारून दिला. कोपर्निकस याचा सिद्धान्त डावलून पृथ्वी सूर्याभोवती फिरते, असे सांगून त्याबद्दल गॅलिलिओने तुरुंगवास पत्करला. विजेच्या दिव्याचा शोध लावणाऱ्या एडिसनने आपल्या आधीच्या प्रयोगवीरांच्या साऱ्या कल्पना, सारे प्रयोग खुंटीला टांगून नवी वाट शोधली. त्याच्या आधीच्या प्रयोगवीरांनी वाहकाचा (Conductor) प्रतिरोध (Resistance) कमी कमी करीत प्रयोग केले होते. एडिसन याउलट हा प्रतिरोध वाढवीत गेला. इतरांनी निरनिराळ्या वायूंच्या माध्यमात प्रयोग केले होते. एडिसनने मुळी निर्वातातच प्रयोग केले. एक गोष्ट लक्षात ठेवा, प्रश्न जेवढा

कठीण तेवढी या विक्षिप्त विचारांची गरज अधिक. 'मुकी बिचारी कुणी हाका अशी मेंढरे बनू नका!' म्हणून सांगणाऱ्या माधव ज्युलियनांनी आपणाला नेमके हेच सांगितलंय.

## थोडक्यात काय, नव्या वाटा शोधा—कोलंबस बना.

ही पहा एका शाळेत घडलेली सत्यकथा. मास्तरांनी एक गणितातील प्रश्न विचारला. १०२५ कुस्तीगीरांनी एका कुस्तीच्या स्पर्धेत भाग घेतला होता. कुस्त्या भारतीय पद्धतीने होणार होत्या. म्हणजे कुस्तीगीर एकदा कुस्तीत हरला की स्पर्धेतून बाद होणार होता. आता या स्पर्धेत विजेता कुस्तीगीर ठरेपर्यंत किती कुस्त्या खेळाव्या लागतील? नेहमीच्या पद्धतीने हा प्रश्न सोडवावयाचा तर किमान दहा पंधरा मिनिटे लागतील. म्हणजे एक खेळाडू बाजूला काढा. उरलेल्या दहाशे चोवीस जणांचे सामने म्हणजे पहिल्या फेरीत ५१२ कुस्त्या. दुसऱ्या फेरीत २५६ कुस्त्या. तिसऱ्या फेरीत १२८ कुस्त्या असे करत करत तुम्ही १०–१५ मिनिटांच्या किचकट आकडेमोडीने एकूण कुस्त्या किती झाल्या, हें शोधू शकाल; पण एका विद्यार्थ्याने त्या प्रश्नाचे उत्तर एका सेकंदात दिले. तो म्हणाला, एकूण कुस्त्या १०२४. कारण विजेता सोडून प्रत्येक खेळाडूला आपण ज्यात हरलो असा एक सामना खेळावयास लागला. म्हणजे एकूण सामने १०२५ उणे एक म्हणजे १०२४! थोडक्यात काय नव्या वाटा शोधा कोलंबस बना. प्रश्न जाम सोपा होऊ शकतो. तुम्हीही नकळत ताजेतवाने बनता. लक्षात ठेवा. फार उशीरा उठून सावकाशपणे आईला तीन प्रदक्षिणा घालणाऱ्या गणपतीनेही नेमके हेच केले होते.

## तुमचा प्रश्न ज्ञात गोष्टींच्या संदर्भात समजावून घ्या

म्हणजे होते काय, अनेकदा आपल्या समोर असलेला प्रश्न आपणाला समजला आहे असे आपणाला वाटते; पण तेच मुळात चुकीचे असते! तुमच्या समोरच्या समस्येची म्हणूनच पूर्णपणे ज्ञात असलेल्या गोष्टींच्या संदर्भात तुलना करणे अगत्याचे असते. पदार्थविज्ञानाने प्रकाशकिरण समजावून घ्यायला अणू आणि लहरी अशा ज्ञात गोष्टींचा आधार घेतला. माया, ब्रह्म या गोष्टी संतांनी व्यावहारिक कल्पनांच्या संदर्भातच समजावून सांगितल्या नकाशा आपण आपल्या समोर ठेवतो म्हणूनच आपणाला पृथ्वीचे व आपल्या देशाचे, शहरांमधील अंतराचे ज्ञान होऊ शकते. थोडक्यात काय, तुमच्या समोरच्या अवघड प्रश्नाचा नकाशा तुम्हाला स्पष्टपणे काढता आला पाहिजे. तुम्हाला माहीत असलेल्या कल्पनांच्या वा गोष्टींच्या संदर्भात तो काढता आला पाहिजे. नाही तर 'आग रामेश्वरी बंब सोमेश्वरी' असा हास्यास्पद प्रकार आपण प्रश्न सोडविताना अनेकदा करून बसतो.

## गंज चढतो डोळ्यावर

थोडक्यात तुमच्या समोरचा प्रश्न नीट समजावून घ्या. त्या प्रश्नाचे मर्मस्थान तुम्हाला नीट समजू द्या. त्यानंतरची सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे तो प्रश्न सोडवावयास तुम्हाला उपयोगी पडतील अशा अनेक गोष्टी तुमच्या भोवती पसरलेल्या असतात. त्या गोष्टींचे महत्त्व आपणाला पुरेसे समजलेलें नसते. खरे पाहता 'गंज चढतो डोळ्यावर' हे आपणा सर्वांच्याच बाबत अनेकदा घडते. नशिबवान माणसे नेमके हे होऊ देत नाहीत. बिरबलच्या एका गोष्टीत समोरून धावत येणाऱ्या मस्त हत्तीने एक भला मोठा पहिलवान सरळ चिरडून टाकला. मात्र रस्त्यावरून जाणाऱ्या एका फाटक्या माणसाने जवळून जाणाऱ्या कुत्र्याची तंगडी धरून त्याला गोल फिरवून सरळ हत्तीच्या मस्तकावर भिरकावला. या अनपेक्षित प्रकाराने भांबावलेला हत्ती निमूटपणे माघारी फिरला. तुमच्या भोवताली असलेल्या गोष्टींची योग्य पारख असणे म्हणूनच महत्त्वाचे. महात्मा गांधींचे संघटनाकौशल्य आणि त्यांची साधनशुचिता या गोष्टी महत्त्वाच्या तर खऱ्याच; पण त्यांचे खरे मोठेपण म्हणजे ब्रिटिश सत्तेची नाडी त्यांनी बरोबर ओळखली. 'कायद्याचे राज्य' ही ब्रिटिशांची स्वतःबद्दलची जाहिरात होती. कायदा मोडणाऱ्याला पण ते कायद्यानेच शिक्षा देऊ शकत होते. भारतीय जनमानस गांधींनी जाणले होते. अहिंसा, सत्याग्रह, राम-रहिम-प्रेम या समाजात खोलवर रुजलेले आहे. आता एखाद्याने फार थोडा प्रतिकार केला तर ब्रिटिश त्याला फार थोडी शिक्षा देऊ शकत होते; पण खूप जणांनी फार थोडा प्रतिकार केला तर त्याचा एकत्रित परिणाम मात्र फार मोठा होत होता. मूठभर मीठ हातात घेऊन पुढे येणाऱ्या सहस्रावधी लोकांना काय शिक्षा द्यावयास हवी, हा प्रश्न ब्रिटिशांना खरे पाहता कधीच सोडवता आला नाही. शत्रूचे मर्मस्थान आणि आपले शक्तिस्थान जाणणारा एखादा बनिया काय चमत्कार करतो हे महात्माजी जगाला दाखवू शकले.

## थोडे अस्वस्थ बना

'थांबला तो संपला' ही माधव ज्युलियनांची काव्यपंक्ती शब्दशः खरी आहे. आपण एखाद्या प्रश्नावर शोधलेले उत्तर हे चांगले आणि अखेरचे आहे अशा भ्रमात जगातील कोणताही यशस्वी माणूस कधी रहात नाही. जुन्या प्रश्नावर अधिक परिणामकारक नवा तोडगा शोधण्यात तो मग्न असतो. 'ठेविले अनंते तैसेची रहावे, चित्ती असो द्यावे समाधान' हे त्याला साफ नामंजूर असते. 'पाहिजे अनंता तेथेची ठेवावे चित्ती नसो द्यावे समाधान' अशीच त्याची धारणा असते.

## इतरांना बोलते करा

'ऐकावे जनाचे करावे मनाचे' या म्हणीतील 'ऐकावे जनाचे' हे प्रथम येते आणि ते अधिक महत्त्वाचे आहे, हे आपण अनेकदा साफ विसरून जातो. उलट आपण अनेकदा नेमकी उलटी कल्पना करून घेतो. जवळच्या माणसांना आपल्याला आपल्या प्रश्नावर बोलते करता आले पाहिजे. जगातील फार मोठे शास्त्रज्ञ आणि तत्त्वज्ञ अगदी लहानातील लहान माणूस वेगळे व विक्षिप्त विचार घेऊन आला तर त्याची खिल्ली उडवीत नाहीत, तर त्यांना पुरेशी संधी देतात,असे आढळून आले आहें. इतरांना ऊठवस सल्ला देण्याऐवजी इतरांचा सल्ला मिळविणे ही एक अवघड पण आवश्यक कला आहे. यानंतरच 'करावे मनाचे' हा भाग सुरू होतो. लोकांशी भरपूर विचारविनिमय केल्यावर लोकांना विसरून पूर्ण एकांतात तुमच्या मनाच्या तळाशी तुम्हाला जाता आले

पाहिजे. विश्वास ठेवा, विज्ञान सांगते गांधींच्याप्रमाणेच प्रत्येकाला 'आतला आवाज' असतो. तो आवाज तुमचा प्रश्न सोडविताना महत्त्वाचा असतो. विज्ञानक्षेत्रातही नवे व महत्त्वाचे सिद्धांत देणारे अनेक शास्त्रज्ञही आपल्या प्रयोगांपेक्षा आपल्या आतल्या आवाजाशीच अधिक प्रामाणिक राहिलेले होते.

**परिस्थितीचा संदर्भ कधी विसरू नका.**

मोशे रोबिनस्टाइन यांच्या मते सर्वांत शेवटची आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे ज्या परिस्थितीच्या संदर्भात आपणाला प्रश्न सोडवावयाचा आहे त्याचे कधी विस्मरण होऊ देऊ नका. तुम्ही जी मूल्ये मनाशी बाळगली आहेत त्यांच्याशी प्रतारणा करून कधी प्रश्न सोडविता येत नाहीत. फक्त नवे प्रश्न निर्माण होतात.

या संदर्भात रोबिनस्टाइन यांनी एक मजेशीर किस्सा सांगितलाय. त्यांनी त्यांच्या अमेरिकन आणि अरब विद्यार्थ्यांना एक प्रश्न विचारला, 'समजा बोटीत बसून तुम्ही आई, मुलगा आणि बायको यांच्याबरोबर प्रवास करताय. बोट बुडणार आहे आणि तुम्ही फक्त एकच व्यक्ति वाचवू शकता तर तुम्ही कुणाला वाचवाल ?' – अमेरिकन विद्यार्थ्यांपैकी साठ टक्के विद्यार्थ्यांनी आपण बायकोला वाचवू, म्हणून सांगितले. चाळीस टक्के जणांनी मुलाला वाचविण्याचे ठरविले. आईला वाचविणारा एकही महाभाग आढळला नाही ! याउलट शंभर टक्के अरब विद्यार्थ्यांनी सांगितले, आपण आईला वाचवू ! बायको काय एक मेली तर दुसरी मिळते ! पोरेही देवकृपेने भरपूर होतात ! माडगूळकरांच्या दरवेशी कथेची आठवण यावी अशी ही गोष्ट. आता अमेरिकन वा अरब लोकांच्या संदर्भातले काही महत्त्वाचे निर्णय तुम्हाला घ्यावयाचे असतील तर त्यांच्या स्वभावातील हे असले अनेक संदर्भ तुम्ही विसरू शकणार नाही. हे असे संदर्भ विसरले गेले तर कुटुंबनियोजनाच्या सक्तीतून आपल्या देशात निवडणुकीत महाभारत घडते ! गाई आणि डुकरांच्या चरबीतून १८५७ चे बंड पेटते !

ही अशी पहाणी व हे असे नवे तंत्र घेऊन प्रश्न सोडविण्याचे नवे मार्ग सांगत आणि लोकांना यशस्वी होण्याचा गुरुमंत्र देत डॉ. मोशे रॉबिनस्टाइन गेली दहा वर्षे हिंडताहेत. त्यांनी हे नुसते पुस्तक लिहिलंय असे नव्हे गेल्या दहा वर्षांत एक हजाराहून अधिक लोकांना त्यांनी हा अभ्यासक्रम दिलाय. त्यांच्या या विद्यार्थ्यांत डॉक्टर्स आहेत, शास्त्रज्ञ आहेत, तंत्रज्ञ आहेत, कारकून आहेत, सैनिक आहेत आणि कवीही आहेत आणि किमानपक्षी मोशे रॉबिनस्टाइन आणि त्यांचे विद्यार्थी यांचा दावा आहे की, या सर्वांचा या अशा अभ्यासक्रमामुळे भरपूर फायदा झालाय. □

**तीन राजहंस प्रकाशने**

**फिडेल, चे आणि क्रांती**
अरुण साधू
सात रुपये

**आणि ड्रॅगन जागा झाला**
अरुण साधू
चवदा रुपये

**पूर्णिया**
अनिल अवचट
सहा रुपये

राजहंस प्रकाशन पुणे

१०२५ सदाशिव
पुणे ४११ ०३०

# आमचे ग्रंथालय

**SINATRA**

**An Unauthori zed Autobiography**
**by Earl Wilson,**
**Pages 361, New American Library**
**Price 2.25**

अर्ल विल्सन हा हॉलिवूडवर लिहिणारा प्रख्यात लेखक आहे. त्याचे या आधीचे पुस्तक 'शो बिझनेस लेड बेअर' हे आमच्या ग्रंथालयात बऱ्याच वाचकांनी वाचले. त्यांना ते आवडलेही. केनेडी याने बऱ्याच स्त्रियांशी रतिक्रिडा केल्या. यावर अर्ल विल्सन एकदा या पुस्तकात असे म्हणाला होता, 'The F in JFK stands for fornicatyon!'

अर्ल विल्सन हा सिंडिकेटेड कॉलमनिस्ट आहे. त्याचे सदर तीनशे वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होत असते. हे सदर कोटयवधी लोक वाचतात. त्याचे 'Show Business Nobody Knows' हे पुस्तक कधी मिळेल याची मी वाट बघत आहे. अर्ल विल्सन दिसण्यात अगदी 'क्रूड बिझिनेसमन 'सारखा दिसतो. त्याचा गळा आणि घसा जणू गालगुंड होऊन एक झाले आहेत असे आपल्याला वाटते. जिवणीही तशी हलकटासारखी बरीच पुढे आलेली आहे; पण त्याचे लिखाण त्याच्या बाह्यरंगाच्या अगदी विरुद्ध आहे. त्याची शैली धारदार आहे. हॉलिवुडच्या जगातील विविध किस्सेही तो फार चांगल्या तऱ्हेने रंगवितो. हिंदी सिनेमातल्या नटावर लिहिणारी जशी देवयानी चौबळ तसाच थोडासा हॉलिवुडबद्दल लिहिणारा अर्ल विल्सन.

अर्थात कोणत्याही यशस्वी अमेरिकन व्यक्तीप्रमाणे फ्रँक सिनात्रा हा 'ग्रेट वुमनायझर' होता. त्याचे संबंध अमेरिकन अध्यक्षाशीही होते व माफियाशीही होते. (अध्यक्षाशी संबंध असले तर माफियाशीही संबंध येणार हे ओघाने आलेच म्हणा! भारतात जशी ब्लॅक मनी ही 'पॅरलल इकॉनॉमी' आहे असे अमेरिकेत 'माफिया' हे 'पॅरलल गव्हर्मेंट' आहे, असे म्हटले जाते.) या पुस्तकात अर्ल विल्सनने फ्रँक सिनात्राची कुत्सित बुद्धीही दाखविली आहे व त्याचे उमदे चारित्र्यही. हॉलिवुडमध्ये फ्रँक सिनात्राविषयी नितांत आदर, द्वेष; कौतुक, प्रेम, तिटकारा वगैरे परस्परविरोधी भावना निर्माण झाल्या होत्या.

शर्ले मॅक्लिन हिने 'You Can't get There from Here' या पुस्तकात म्हटले होते की, 'फ्रँक सिनात्राला गुंडांविषयी एक प्रकारचे कौतुक वाटत असे. जणू त्याला एक गुंडच व्हायचे होते!' सिनात्राने रिचर्ड निक्सन व रोनाल्ड रीगन या गुंडांना (?) पाठिंबा दिला होता. सिनात्राच्या राजकीय मताविषयी त्याचे व शर्ले मॅक्लिनचे नेहमीच खटके उडत असत.

सिनात्राचा अहं फारच फोफावलेला असे. त्यामुळे त्याची भांडणेही भरपूर होत असत. एकदा एक नट वैतागून म्हणाला, 'Who does he tnink he is a God?' त्यावर दुसरा म्हणाला 'NO-GODFATHER!'

एकदा सिनात्राविषयी मार्लोन ब्रान्डो म्हणाला होता, 'आता त्याला टक्कल पडले आहे. त्यामुळे त्याला विग घालायला लागतो. त्याला आलेल्या ह्या म्हातारपणाबद्दल तो देवाशी सुद्धा भांडत असेल!' एकदा जेरी एन्जल या फोटोग्राफरने सिनात्रा व मिया फॅरोंचा एक थोडासा Spooky (भुतासारखा) फोटो घेतला होता. हा फोटो उतारवयात व न विचारता घेतला होता. त्यामुळे त्या फोटोग्राफरवर सिनात्रा भलताच उखडला होता.

सिनात्राचा उतावळेपणा व भांडखोर स्वभाव जितका प्रसिद्ध आहे तितकाच त्याचा उमदा स्वभावही. त्याच्या ओळखीच्यापैकी कुणी आजारी पडले तर हॉस्पिटलचे बिल देण्यासाठीही तो उतावळा होई! याबाबतीत तो इतका प्रख्यात आहे की, काही लोकांना शंका आली की, सिनात्राला डॉक्टर्स व रुग्णवाहिका-चालकांकडून बक्षीस मिळत असावे!

सिनात्रा हा कितीही लोकप्रिय असला तरी तो सुखी नाही, असे अर्ल विल्सन म्हणतो. त्याचे कारण त्याने टेलिव्हिजन व प्रेस यांच्याशी अतोनात भांडणे केली व किती तरी शत्रू निर्माण केले. एकदा विमानातून सिनात्रा उतरला तेव्हा एका मनुष्याने सिनात्रावर शिव्यांचा वर्षाव केला. सिनात्रा त्याला मारायला धावला! तोच त्याला दिसले की, शिव्या देणारा माणूस लंगडा आहे आणि त्याच वेळेला समोर त्याला एक प्रेस-फोटोग्राफरही दिसला. या फोटोग्राफरला सिनात्रा बिचाऱ्या एका लंगडयाला मारीत आहे असे मुद्दाम व खोटेच दाखवायचे होते! तेव्हापासून सिनात्राला प्रेसविषयी द्वेष वाटू लागला. सिनात्राच्या जीवनाचे रहाटगाडगे हे नेहमी जोरात फिरत असे. ऐन तारुण्यात त्याने गाण्यात अमाप कीर्ती व पैसा मिळविला; पण थोडयाच वर्षांनी, म्हणजे त्याच्या तिशीत त्याची कीर्ती बरीच लोप पावली. त्यानंतर काही काळाने परत तो प्रकाशझोतात आला व पूर्वीइतकाच लोकप्रिय झाला; परंतु परत काही वर्षांनी तो निवृत्त झाला व परत कार्यरत झाला. त्या सुमाराला त्याला बऱ्याच समस्यांना तोंड द्यावे लागले.

एकदा रॅक्स रीड सिनात्राविषयी म्हणाला होता, 'सिनात्राची जनसामान्यातील प्रतिमा ही भाजलेल्या first degree पेशंटसारखी कुरूप आहे. त्याचा चेहरामोहरा पॉर्की पिगपेक्षाही बावळट आहे, मागासलेल्या लोकांइतकाही शिष्टाचार त्याच्यात नाही, त्याचा अभिमान सहारापेक्षाही मोठा आहे. त्याचा आवाज जर शेवटपर्यंत चांगला राहिला असता तरच हे क्षम्य होते; पण अलीकडे त्याचा आवाज म्हणजे कावळ्या-

इतका कर्कश झाला आहे. आता का म्हणून त्याचा रुवाब सहन करून घ्यावा ? '

फ्रँक सिनात्रा याचे व्यक्तिमत्त्व Schizoid होते का ? Schizoid व्यक्तिमत्त्व व Scizophrenia यामध्ये पुष्कळच तफावत आहे, असे मानसशास्त्रज्ञांचे म्हणणे आहे Schizoid व्यक्तिमत्त्व हे एकाकी ( standoffish, aloof ) असते. त्याच्याजवळ ते फारसे कोणाला येऊ देत नाही. तर schizophrenia हा एक प्रकारचा गंभीर आजार असतो. त्यात खोटे आवाज ऐकू येतात व आभास निर्माण होतात.

हा sceizoid सिनात्रा आपल्या शरीराला कुणाला हात लावू देत नसे. त्याला कुणी पाठीवर थाप मारली किंवा मित्राने आलिंगन दिले तर तो एकदम भडकत असे व झटकन बाजूला सरकत असे.

एकदा मेरेलिन मन्रो ही lesbian (स्त्रीनेच स्त्रीवर प्रेम करणे ) आहे असा दाट संशय तिचा नवरा जॉ डी. मेजियो याला आला. मेरिलिन मन्रो ही लेस्बियन तर आहेच पण ती एका बाईबरोबर मादक औषधांचे सेवन करते, अशीही कुणकुण त्याच्या कानांवर आली होती. आता मॅजियोने लागलीच खाजगी डिटेक्टिव्हज् ठेवून सिनात्राला बरोबर घेतले व मेरिलिन मन्रोच्या स्त्रीप्रेमीच्या फ्लॅटवर ' रेड ' घातली ! पण मेरिलिन मन्रो तेथे नव्हतीच ! ती दुसऱ्याच फ्लॅटमध्ये होती. जी बाई तिथे होती तिने वैतागून सर्वांवर खटला भरला; पण सिनात्राने आपण खाली मोटारीमध्ये बसलो होतो असा बचाव केला व कोर्टाने तो मान्य केला. हे प्रकरण म्हणजे ' Wrong Door Raid ' म्हणून हॉलिवुडमध्ये त्या वेळी प्रख्यात झाले होते !

प्रेसिडेंट केनेडी हा विसाव्या शतकातील ' ग्रेट वुमनायझर ' होता असे प्रथम अर्ल विल्सननीच लिहिले होते. केनेडी व त्याचा भाऊ बॉबी केनेडी या दोघांशी मन्रोचे शरीरसंबंध होते. तसेच प्रेसिडेंट केनेडी, सिनात्रा व गीयानका ( हा माफिया गुंड होता ) यांच्यात असा एक संकेत ठरला होता की, सुंदर स्त्रिया आपल्या तिघांमध्ये वाटून घ्याव्यात व अदलाबदल कराव्यात ! अर्थात् हेसुद्धा अर्ल विल्सननेच लिहिले आहे.

एकदा एक माफीया गुंड म्हणाला, ' सिनात्रा आमच्या कंपूत नाही. तो फार वेंधळा आहे. कोणाच्याही बंदुकीच्या गोळीचे तो सहज लक्ष्य बनू शकेल ! '

एकंदर हे पुस्तक फार वाचनीय आहे.

— जे. एन्. पोंडा

— फिनिक्स लायब्ररी


**Some New Titles Recieved**

| | | |
|---|---|---|
| 1. | East of Desolation ( Thriller ) Higgins jack | Rs. 9·95 |
| 2. | Dragons At the Qate (Best-seller, A fastpaced, super Thriller) Robert L. Duncan | Rs. 17·75 |
| 3. | The Man Who Wasn't There ( Best-seller, Thriller ) Macleish Roderick | Rs. 15·95 |
| 4. | The Auctioneer ( Best-seller, Supernatural, terrifying Thriller ) Samson Joan | Rs. 17·75 |
| 5. | All My Yesterdays (Memories, Sketches of great & small men ) Prem Bhatia | Rs. 6·00 |
| 6. | Sinatra ( Best-seller, Biography ) Earl Wilson | Rs. 25·00 |

**मराठी**

| | | |
|---|---|---|
| १. | जन्मठेप (अनु. कादंबरी) लीलावती भागवत | रु. ११·२५ |
| २. | दुश्मन (कादंबरी) प्रभाकर दिघे | रु. १५·०० |
| ३. | वीर्यदाता सुखी भव (कादंबरी) पुरुषोत्तम बावकर | रु. १५·०० |
| ४. | आगंतुक (कादंबरी) शेखर ताम्हणे | रु. १५·०० |
| ५. | जनावरं ( कादंबरी ) प्रभाकर दिघे | रु. १५·०० |
| ६. | पायगुण ( कादंबरी ) योगिनी जोगळेकर | रु. १५·०० |
| ७. | बाप ( कादंबरी ) चि. त्र्यं. खानोलकर | रु. १२·०० |
| ८. | जिराफ ( कादंबरी ) विष्णू जयवंत बोरकर | रु. १२·०० |
| ९. | वेडगळ ( कादंबरी ) जयवंत दळवी | रु. १४·०० |
| १०. | टच ( सिनेकथा ) अशोक प्रभाकर डांगे | रु. १०·०० |
| ११. | उद्याची बात ( कादंबरी ) वैजयंती काळे | रु. १२·०० |
| १२. | शहारा ( भयविस्मय कथा ) शकुंतला गोगटे | रु. १२·०० |
| १३. | दुःख झाले वेडेपिसे ( कादंबरी ) कल्याणी हर्डीकर | रु. १२·०० |

* नॉन मेंबर्सना डेली बेसिसवर पुस्तके वाचावयास मिळतील.
* ' फिनिक्स 'चे सभासदत्व ही आपल्या उच्च अभिरुचीच साक्ष आहे !
* पुस्तकांना ' फिनिक्स ' पद्धतीने मजबूत व आकर्षक बाईंडिंग व प्लॅस्टिक कव्हर्स
* अत्युत्तम पुस्तके

The Phoenix Library
727 Opp. Sadashiv Post
Poona–30

रंगभूमी

# आपलं बुवा असं आहे!

## नाव प्रायोगिक, दर्जा व्यावसायिक !

'आपलं बुवा असं आहे' हे 'अनिकेत'चं नवं विनोदी नाटक पाहताना मी सुमारे दहाएक मिनिटं गाढ झोपी गेलो होतो. (असं शेजारपाजारच्या तिकिट-धाऱ्यांनी मला सांगितलं.) त्यामुळं त्या नाटकाबद्दल काही लिहिताना जरासं 'हे'च वाटतंय्. पण जागेपणी जे जे काही पाहिलं, त्यावरून ती दहा मिनिटंही जागाच राहिलो असतो तरी फरक पडला नसता, अशी स्वतःची समजूत घालून हे लिहितो आहे.

'आपलं बुवा असं आहे' हे नाटक मनोहर काटदरे नावाच्या गृहस्थांनी लिहिलं आहे. हे 'घेतलं शिंगावर' या फार्सचे लेखक. त्या फार्सचे इतके अजबगजबचे प्रयोग हौशी आणि अतिहौशी रंगभूमीनं केलेले आहेत की, मराठी प्रेक्षकांच्या मनातली त्याच्याविषयीची संवेदनक्षमता मेली असणं अशक्य नाही; पण तरीही ती एक बऱ्यापैकी लाइट कॉमेडी होती. 'आपलं बुवा असं आहे' या शीर्षकाशी काडीमात्र संबंध नसलेल्या नाटकात मात्र काटदऱ्यांना स्क्रिप्टची भट्टी साधलेली नाही, असं मला वाटलं. यातले काही प्रसंग आणि संवाद उत्तम विनोदी म्हणून निश्चितच दाखवून देता येतील. तथापि संपूर्ण व अंतिम परिणामकारकतेचा विचार केला तर फार्सिकल कॉमेडी आणि ब्लॅक कॉमेडी या दोन तारांवरची कसरत करतानाच पुन्हा वास्तव दर्शनाचं भान तर सुटू द्यायचं नाही आणि नवनाट्याच्या क्लृप्त्यांचा वापर फार्सचा पारंपरिक चौकटीतल्या क्लृप्त्यांऐवजी करायचा हा व्याप, गुंतागुंतीचा खटाटोप अखेरीस लेखकाच्या व दिग्दर्शक–कलाकारांच्याही आटोक्याबाहेर गेला आहे. उदाहरण देतो. नाटकाचा पहिला अंक; ज्यात मुंबईच्या मध्यमवर्गीय नायक-नायिकांचं साधारण पारंपारिक पद्धतीनंच 'जमतं'; हा बराचसा फार्सिकल कॉमेडीच्या अंगानं हाताळल्यासारखा वाटतो. लेखन आणि प्रस्तुतीकरण या दोन्हींच्या दृष्टिकोनातून आणि (बहुधा) तिसरा अंक, ज्यात गैरसमजापोटी दुरावलेल्या नायकनायिकांची पुनर्भेट–वाटाघाटी चालतात; हा भाग उघडच ब्लॅक कॉमेडीच्या वळणावर जातो, असं मला वाटतं. आता या दोहोंचा सांधा जुळवायची जबाबदारी ज्याच्यावर, तो दुसरा अंक अतिशय रेंगाळतो, कंटाळवाणा होतो आणि नाटकाची पकड कमी करतो. नायकनायिकांचं लग्नानंतरचं नवथर परस्पर प्रेम आणि कालांतराने अटळपणे उद्भवणारे मतभेद हा कथाभाग दुसऱ्या अंकात मांडलाय्. अगदी वास्तववादी पद्धतीनं. आता वास्तवदर्शनामुळं नाटक कंटाळवाणं होतं, असं मला बिलकूल सुचवायचं नाही; पण तो प्रकार जितका लांबवलाय आणि संथपणे चालवलाय् तितका रंजक आणि लक्षवेधक मात्र करता आलेला नाही; एवढीच माझी तक्रार आहे.

नाटकाच्या लिखाणात आणखीही काही घोटाळे आहेत. उदाहरणार्थ नाटकाची सुरुवात दिलीप कुलकर्णी नावाच्या पात्राच्या, प्रदीर्घ स्वगताने होते. (हे काम करणाऱ्या कलाकाराचे वास्तवातील नावही तेच आहे, अशी माझी समजूत आहे.) हे गृहस्थ आपलं काम समजून इमानदारीत आणि चोख बजावतात; याबद्दल शंका घेता येणार नाही. तथापि त्या पात्रावर नाटक वाजवीपेक्षा जास्त रेलून उभे आहे, आणि तेवढी ताकद त्या भूमिकेतच नाही. कारण हे पात्र एकाच वेळी जुन्या संगीत नाटकातला सूत्रधार, ग्रीक शोकनाट्यातला कोरस आणि काव्यनाट्यात (verse drama) किंवा कादंबरीमध्ये अनेकदा आढळणारा (बहुश: तटस्थ असा) निवेदक (narrator) अशा तीन भूमिकांची कामगिरी थोडथोडया प्रमाणात पण एकत्रितपणे पार पाडते. या थ्री इन वन् कॅरॅक्टरायझेशनचा स्वीकार करायचा ठरवला तर दुसरीकडे हे पात्र, नायकाचा जिगरदोस्त या नात्यानं नाटकाच्या अंत:पुरातच घुसलेलं दिसतं. कथाप्रवाहाशी त्याचं Organic relation असल्याचाही भास होतो. या दुहेरी जबाबदारीच्या कुतरओढीत काही विशेष कलात्मक गुंतागुंत असल्यास न कळे; पण त्यामुळे त्या पात्राचं नक्की status अस्पष्ट राहतं आणि त्याच्या कामगिरीला मर्यादा पडतात, असं मला प्रामाणिकपणे वाटतं. त्याचा वारंवार केलेला वापर गोंधळ निर्माण करणारा वाटला आणि नायक-नायिकांच्या संदर्भात तर त्याला काही वेळा band conductor ची किंवा कळसूत्री बाहुल्या नाचविणाऱ्याचीच कळा आल्याचा भास झाला. लेखकाला नाटकावर हुकमत चालवायची होती म्हणून त्यानं आपला हा प्रतिनिधी निर्माण केला की काय, अशी शंकाही आली. कदाचित मी अतिशयोक्ति करीत असेन.

या पात्राचं नाटकाच्या सुरुवातीचं स्वगत माझ्या तरी सहनशक्तीचा अगदी अंत पाहणार ठरलं. आपण एखाद्या रटाळ एकपात्री नकलांच्या कार्यक्रमाला चुकून येऊन बसलो की काय, असं वाटायला लागलं. हा क्षुल्लक इसम आपला फावला वेळ काय काय निरुद्योग करीत घालवतो, हे प्रेक्षकांना सविस्तर सांगून मग 'गेला की नाही तुमचा वेळ ?' अशी त्यांची फिरकी घेणं ही थट्टा कलात्मक असली किंवा नसली तरी क्रूर नक्कीच होती. प्रेक्षक नाटकांना येतात ते वेळ घालवण्यासाठी किंवा पैसा उधळण्यासाठी नव्हे हे अनिकेतवाल्यांना किंवा काटदऱ्यांना ठाऊक नसेल असं नाही; पण समजूनउमजूनही त्यांनी या पात्राला नाना चाळे करायला मोकळं सोडलं आहे. हे कुलकर्णीअप्पा मधनंमधनं प्रेक्षकांशी सुखसंवाद काय करतात, मध्येच एकदा स्टेजवरून उतरून प्रेक्षकात काय घुसले–अशा गिमिक्स आता निदान 'जुन्या झाल्या' म्हणून तरी वापरू नयेत अशी एक आग्रहाची शिफारस नाटकवाल्यांना करावीशी वाटते. या पात्राकरवी जो आणखी एक महत्त्वाचा उद्योग लेखकानं केलेला आहे तो प्रेक्षकांना वारंवार 'हे नाटक चाललं आहे' ही जाणीव करून देण्याचा, ऊर्फ थोडक्यात तथाकथित detachment किंवा alienation इ. इ. साधण्याचा. (याला चांगलासा मराठी प्रतिशब्द मला सुचत– माहीत नाही.) ओघात विषय निघालाय तर याबद्दल थोडंसं लिहिणं आवश्यक वाटतं. हे detachment technique (ज्याचं अंतिम पितृत्व नवनाट्याचे पुरस्कर्ते गरीब बापड्या ब्रेख्टच्या माथी मारतात), नव्या रंगभूमीवर आज अगदी फड्या निवडुंगासारखं माजलेलं

दिसतंय. या नाटकातही दर पाच मिनिटां-गणिक अशी एखादी काटेरी सूचना आहेच. मग त्याला अनिकेतवाले भले alienation technique म्हणोत वा न म्हणोत. हे तंत्र एकंदरीत नक्की काय आहे, ते कुठे कुठे, कसं आणि का वापरायचं असतं याबद्दल कुणी अनुभवी नाटकवाला–तज्ज्ञ समीक्षक मला आणि माझ्यासारख्या तमाम अडाणी प्रेक्षक-वर्गाला ज्ञानदान करील तर उपकार होतील. आम्ही मराठी प्रेक्षक मारे अतिसुबुद्ध, प्रगल्भ अभिरुचीचे वगैरे नसू कदाचित; पण 'आम्ही थिएटरात बसून नाटक बघतो आहोत,' ह्याची जाणीव नाटक करणाऱ्यांनीच आम्हाला वारंवार द्यावी इतके आम्ही बुद्दू आहोत काय? ती जाणीव (किंवा बोचणी) तिकिटाच्या खिडकीत उभं राहल्यापासूनच आम्हाला असते. मुळात (माझ्या समजुती-प्रमाणे) ब्रेख्टनं (आणि आपल्या नाटक-वाल्यांना मॉडेल्स पुरविणाऱ्या इतर कुणा पाश्चात्त्य नाटककारांनी) हे तंत्र वापरलं ते प्रेक्षकांना हसविण्याची एखादी चमत्कृतिपूर्ण क्लृप्ती म्हणून नव्हे किंवा एखादं थिअॅट्रिकल गिमिक् म्हणूनही नव्हे. एखादा जबरदस्त, भारावून टाकणारा नाट्यानुभव घेताना प्रेक्षक त्यातच पूर्णपणे गुंतून पडून त्यांच्या रसग्रहणक्षमतेवर आणि विचारविवेकावर मर्यादा पडू नयेत आणि काहीशा कलात्मक अलिप्ततेनं त्यांना तो अनुभव घेता–पचवता यावा, हा या तंत्राच्या वापरामागचा मूळ उद्देश. आपल्याकडे आज जो उठतो तो प्रेक्ष-कांना नाटकापासून detach करायला निघतो. अरे, ज्या दर्जाची नाटकं तुम्ही करता त्यांच्या-पासून शहाणे प्रेक्षक मनानं कधीच detach झालेले असतात. म्हणून तर व्यावसायिक नाटकं चालत नाही आणि प्रायोगिक रंगभूमी वाढत नाही अशी ओरड होते. असा कोणता जबरदस्त नाट्यानुभव 'आपलं बुवा असं आहे' मध्ये आपण प्रेक्षकांना देतोय असं अनिकेतवाल्यांना वाटतं की, ज्यापासून प्रेक्ष-कांना कायम detachment द्यावी लागावी? की या alienation technique चंही त्यांना विडंबन करायचं होतं कोण जाणे! पण तसं असलं तरी ते विडंबनही हास्योत्पादक होण्या-ऐवजी हास्यास्पद झालं झालं आहे. या नाटकात सात दिवसांचा काळ गेला हे दाखवण्यासाठी दिलीपमहाराज कुलकर्णी हे रिंगमास्टरसारख्या ऑर्डर्स सोडून सात वेळा दिव्यांची उघडझाप करून घेतात आणि 'कशी जिंकली?' अशा आविर्भावात तो चाळा पुढेही रिपीट करतात. काही रसिक प्रेक्षक याला गंमत मानून हसतात आणि टाळ्या देतात, ही घटना तर माझा रक्त-दाब वाढवून गेली. या नाटकात वापरलेल्या या असल्या गिमिक्स फक्त एकत्र करून ते एक स्वतंत्र सामाजिक बालनाट्य म्हणून अनिकेतकरांनी काढावं अशी माझी शिफारस आहे. तीन महिन्यात शतकमहोत्सव होऊन जाईल. एकीकडे मारे प्रेक्षकांना नाटकात सामील करून घ्यायला बघायचं, (कुल-कर्ण्यांच्या) दिलीपकुमारांनी त्यांच्याशी लांब-लचक आणि एकतर्फी गप्पा मारायच्या, अगदी इंटिमेट थिएटर वगैरे क्रिएट करायला बघायचं आणि दुसरीकडे विंग्ज, नेपथ्यबदल, प्रकाशयोजना, अंकाचा पडदा यांचे उल्लेख–कृती करून (आधीच जेमतेम गुंतवणाऱ्या नाटकापासून) प्रेक्षकांना detach करायला बघायचं, हा कलात्मक न्याय मोठा औरच म्हटला पाहिजे.

असो. संथ गतीनं हलणारं आणि दुसऱ्या–तिसऱ्या अंकात अतिसंथ, अतएव रटाळ, होणारं हे नाटक सावरून धरायचा आटो-काट प्रयत्न नाटकातल्या इन–मिन–तीन पात्रांनी केलेला आहे याची नोंद करणे आवश्यक आहे. दिलीपकुमारांनी आपली गुंतागुंतीची कामगिरी चोख बजावल्याचा उल्लेख मागे आलाच आहे. चित्रा पालेकर यांच्याही बाबतीत तोच अभिप्राय देता येईल. तथापि ही भूमिका त्यांच्या एकंदरीत 'प्रकृती'ला फारशी साजणारी नव्हती असं मला वाटलं. सिनेइष्टार अमोल पालेकर यांना, त्यांच्या एन्ट्रीपासून काहीही केलं तरी शिट्टया–टाळ्या देणाऱ्या चाहता-वर्ग नाटकाला लाभतो आहे, यात त्यांचा दोष नाही. त्यांनी आपल्या पठडीतला संकोची मध्यमवर्गीय सामान्य तरुण सवयीच्या सफा-ईनं उभा केलेला आहे. त्यांचा आवाज मात्र नेहमीपेक्षा काहीसा जास्तच एकसुरी आणि कोता वाटला.

तीन अंकी नाटकापर्यंत कथासूत्र ताण-ण्याचा हट्ट धरला नसता तर या नाटकाची–विशेषत: पहिल्या अंकाची चांगली एकांकिका झाली असती, एवढंच म्हणून थांबतो.

**–मी**


**तरुण भारत वासंतिक अंकासाठी**

## लघुकथा स्पर्धा

तरुण भारतच्या वासंतिक अंकासाठी लघुकथा स्पर्धा आयो-जित करण्यात आली आहे. उत्कृष्ट ठरणाऱ्या पहिल्या चार कथांना खालीलप्रमाणे पारितोषिके देण्यात येतील.

| | |
|---|---|
| प्रथम क्रमांक | रोख रु. २०० |
| द्वितीय क्रमांक | रोख रु. १५० |
| तृतीय क्रमांक | रोख रु. १०० |
| चतुर्थ क्रमांक | रोख रु. ७५ |

याव्यतिरिक्त उल्लेखनीय दोन कथांना उत्तेजनार्थ म्हणूनही काही पारितोषिक देण्यात येईल. कथेची शब्दमर्यादा जास्तीत जास्त ४००० शब्द. कथा पोहोचण्याची शेवटची तारीख २० मार्च १९७८. आपली कथा संपादक, तरुण भारत, १३६५ शुक्रवार पेठ, पुणे २ या पत्त्यावर पाठवावी. **वासंतिक कथा स्पर्धेसाठी** असा स्पष्ट उल्लेख पाकिटावर असावा.

कथा परत हवी असल्यास पुरेसे टपालहशील सोबत असावे व कथा परत पाठवावी असा स्पष्ट उल्लेख त्यात असावा.


**द. म. पतकी**, व्यवस्थापक

सदस्य ; ए. बी. सी. ☐ आयु. ई. एन्. एस्.

☐ नागपूर-पुणे संयुक्त खप १,२५,००० चे वर

# एक देश, एक जनता

एकत्र प्रवास करण्याचा आनंद



## रेल्वेच्या डब्यात एकत्र

गुरुनामसिग मद्रासला जाणाऱ्या गाडीत बसला आहे. तो कामानिमित्त तेथें जात आहे. हा लांबचा प्रवास तसा कंटाळवाणाच. पण डब्यातील लोकांबरोबर गप्पा मारून कंटाळा पार जातो. नागपूर, हैदराबाद, नेलौर, तिरुचिरापल्ली या निरनिराळया ठिकाणीं ही मंडळी जात आहेत. ते आपसात बोलतांना निराळी भाषा वापरतात. पण गुरुनामसिग बरोबर ते मैत्रीच्या भाषेत बोलतात. मैत्रीला कोणतेहि प्रतिबंध नसतात.

davp 77/48 Mar.

प्रतिबंधाच्या कल्पना आळशी लोकांच्या मनात जन्म घेतात; त्यांना दूर करण्यास मदत करा.

सांगण्याप्रमाणे पंडितजींच्या मंत्रिमंडळामधील एक ज्येष्ठ मंत्री आणि पुढे जनसंघाची स्थापना करणारे शामाप्रसाद मुखर्जी यांचा आणि या माताजींचा परिचय होता. नेहरूंनी या संदर्भात शामाप्रसादांकडे विचारणा केली होती. या बाईंचे चित्रही त्यांच्या पहाण्यात आले आणि त्यांनी शामाप्रसादांकडे आपली भेट घेण्याची इच्छा व्यक्त केली. त्यानंतर या बाई दिल्लीस आल्या आणि जवाहरलालजींना भेटल्या. मथाई यांचा याबाबतचा तपशील मात्र वेगळा आहे. जवाहरलालजींच्या खाजगी नोकरवर्गापैकी एक श्री. एस्. डी. उपाध्याय यांनी या माताजींनी लिहिलेले एक पत्र जवाहरलालजींना दिले आणि त्याची भरपूर तारीफही केली. जवाहरलालजींनी बाईंना भेटण्याचे मान्य केले. ही भेट पंतप्रधानांच्या निवासस्थानी झाल्याचे सांगून मथाई आपल्या पुस्तकात लिहितात — मी ज्या वेळी त्यांच्याकडे पाहिले त्या वेळी त्यांचा नीटस बांधा, तारुण्य आणि सौंदर्य माझ्या लक्षात आले. ही पहिली भेट आगामी भेटींचा पाया होती.

या बाई राजकारणावरती भाष्य करीत असल्या किंवा राजकीय नेत्यांना सल्ला देत असल्या तरी प्रत्यक्ष राजकारणापासून दूर राहिल्या. आपण संसदेमध्ये कधीच प्रवेश करणार नाही असे जवाहरलालजींना स्पष्ट सांगितले होते असे त्यांचे म्हणणे आहे. जवाहरलालजींनी आपल्याला उपराष्ट्रपतिपद स्वीकारण्याची विनंती केली होती; परंतु आपण ती नाकारली असाही त्यांचा दावा आहे. आता खरे-खोटे ठरवायला नेहरू हयात नाहीत. मथाई यांच्या खळबळजनक विधानाचा बाईंनी इन्कार केला असला तरी पंतप्रधान आणि ही संन्यासिनी यांच्याबाबतची खरी माहिती हाती लागणे कठीणच दिसते. मथाई यांचे पुस्तक लोकांनी वाचलेच आहे. आता या माताजींचे पुस्तक जेव्हा प्रसिद्ध होईल तेव्हा तेही वाचावे आणि स्वतःपुरता निर्णय घ्यावा हे उत्तम. ◻

## भुट्टोंची कन्या बेनझिर !

जनाब झुल्फिकर अलि भुट्टो तुरुंगाची हवा खात आहेत. अनेक लहानमोठे, खरेखोटे गंभीर आरोप त्यांच्यावर लादले गेले आहेत. भुट्टोंची पत्नी बेगम नसरत भुट्टो आपल्या पतीच्या पाकिस्तान पिपल्स पार्टी या पक्षाची सूत्रे संभाळीत असतानाच केवळ परिस्थितीने रेटा दिल्याने जनाब भुट्टो यांची पंचवीस वर्षांची छोकरी बेनझिर राजकारणामध्ये रस घेऊ लागली आहे. अर्थात बंदुकीच्या धाकामध्ये जिथे राज्य केले जाते आणि लष्करी अधिकाऱ्यांच्या हाती जिथे सत्तासूत्रे असतात अशा ठिकाणी राजकारणामध्ये रस घेणे या गोष्टीला फार मर्यादित अर्थ असतो आणि राजकारणामधील ही लुडबुड कदाचित् अंगाशी येण्याचाही संभव असतो. तरीही बेनझिर आपल्या वडिलांच्या समर्थनार्थ उभी राहिलेली दिसते. तिच्या प्रदीर्घ मुलाखतीचा एक भाग 'इंडिया टु डे' या पाक्षिकाच्या चालू अंकामध्ये प्रसिद्ध झाला आहे. पाकिस्तानवरोबर आपण अशा काही विचित्र प्रकारे बांधले गेलो आहोत की इतर कोणत्याही देशापेक्षा पाकिस्तानमध्ये काय चालते याबाबत आपल्याकडील सर्वसाधारण नागरिकांना नेहमीच उत्सुकता वाटत असते. त्या दृष्टीने बेनझिरची ही मुलाखत लक्षवेधी वाटते. मुलाखत तशी एकसुरी आणि तिच्या वडिलांचे पूर्णपणे समर्थन करणारी असली तरीही या मुलाखतीचे महत्त्व नाकारता येणार नाही.

**प्रश्न :** कोणत्या कारणामुळे तुमच्या वडिलांना अटक करण्यात आली असावी असे तुम्हाला वाटते ?

**उत्तर :** लोकशाहीची पुनस्स्थापना करण्यासाठी आपण भुट्टो यांची हकालपट्टी केली हे प्रस्थापित सरकारला दाखवायचे होते. म्हणून माझ्या वडिलांनी नकली निवडणुका घेतल्या असे त्यांना वाटल्यामुळे त्यांनी माझ्या वडलांना अटक केली. त्यांना मध्यंतरी सोडण्यात आल्यावर त्यांच्या लोकप्रियतेची चुणूक दिसली आणि मार्शल लॉ चा वापर न करण्याचे आश्वासन मोडून माझ्या वडलांना पुन्हा पकडण्यात आले. कोणत्याही परिस्थितीमध्ये भुट्टो यांच्या पाकिस्तान पिपल्स पार्टी या पक्षाला सत्तेवर येऊ द्यायचे नाही अशा अट्टाहासाने विद्यमान शासनकर्ते वागत आहेत.

**प्रश्न :** भुट्टो यांनी घेतलेल्या निवडणुकांमध्ये बनाव करण्यात आला हा आरोप आपल्याला मान्य आहे का ?

**उत्तर :** सर्वसाधारणपणे निवडणुका व्यवस्थितपणे पार पडल्या. काही ठिकाणी दोन्ही बाजूंनी बनवाबनवीचे प्रकार झाले. आमच्या पक्षाच्या १०–१५ उमेदवारांचा त्यामध्ये हात होता. ही गोष्ट पक्षाच्या लक्षात आल्यावर पक्षातर्फे ही सर्व प्रकरणे निवडणुक-आयुक्तांकडे नेण्यात आली.

**प्रश्न :** तुमच्या वडलांची जी चौकशी चालू आहे त्याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

**उत्तर :** ही चौकशी म्हणजे एक छळणुकीचाच प्रकार आहे. चार ऑक्टोबरला जनरल झिया म्हणतात सर्व फाइल्स मी बघितल्या. भुट्टो गुन्हेगार ठरतील एवढा पुरावा हाती आला आहे. या पुराव्याप्रमाणे लाचखोरी, राजकीय खून याबाबत भुट्टो यांना जबाबदार धरता येईल. पुराव्याबाबतची अशी विधाने केल्यानंतर हेच जनरलसाहेब १ जानेवारीला म्हणतात, भुट्टो आणि त्यांचे सहकारी चतुर होते, शिकलेलेही होते. कोणताही पुरावा मागे रहाणार नाही याची काळजी त्यांनी घेतली आहे. आता या दोन विधानांपैकी खरे कोणते समजायचे ? आपल्या विधानाच्या स्पष्टीकरणार्थ बेनझिरने अन्य काही उदाहरणेही दिली आहेत. आरोपींना बेदम मारहाण करण्यात येते. त्यांच्याकडून हवे ते कबुलीजबाब लिहून घेतले जातात आणि न्यायालयाचे सर्व कामकाज गुप्त पद्धतीने चालते या गोष्टींचा तिने उपहासपूर्वक उल्लेख केला आहे. गुप्तचर विभागाचे उपप्रमुख अब्दुल खलिफ यांच्यावर हव्या त्या मार्गाने पुरावा गोळा करण्याची जबाबदारी टाकण्यात आली असून सर्व मार्ग वापरून तो आपले काम चोख बजावीत आहे. माझ्या

माणूस

वडलांच्या अनेक निकटवर्तीयांना पकडण्यात आले आहे. त्यांना कशासाठी पकडण्यात आले, कोठें ठेवण्यात आले आहे, याची माहिती त्यांच्या नातेवाइकांनाही नाही. त्यांच्या छळणुकीच्या अनेक बातम्या मात्र कर्णोपकर्णी पसरल्या आहेत.

**प्रश्न** : तुमच्या पक्षाच्या किती लोकांना अटक करण्यात आली आहे ?

**उत्तर** : नक्की आकडा सांगणे कठीण आहे. कारण ते पकडतात, सोडतात, आवश्यकता वाटल्यास पुन्हा पकडतात. तथापी अंदाज व्यक्त करायचा झाल्यास सुमारे पन्नास हजार पक्षकार्यकर्त्यांना पकडण्यात आले आहे.

**प्रश्न** : विद्यमान परिस्थितीमधून बाहेर पडणे शक्य आहे काय ?

**उत्तर** : नव्वद दिवसात निवडणुका घेण्याची घोषणा करून आपला शब्द मोडणाऱ्या राज्यकर्त्यांबद्दल काय बोलावे ? तथापी लोक-प्रक्षोभ जितक्या मोठ्या प्रमाणात दडपण्यात येईल, तितक्या मोठ्या प्रमाणात तो योग्य वेळी उफाळून येईल. पाकिस्तानचा इतिहास असे सांगतो की, सत्ताधारी सत्तेवरून फेकला गेला की जनतेच्या दृष्टीने त्याची किंमत शून्य होते. भुट्टो हे या गोष्टीला अपवाद आहेत. आज ते सत्तेवर नाहीत; पण जनता त्यांची रोज आठवण काढते. कारण लोकांसाठी त्यांनी खरोखरच काही केले आहे. भुट्टोंबद्दलचे हे जनमानसातील प्रेम ही एक मोठी शक्ती बनली आहे. आता पुढे काय होते ते पहायचे. □

---

स. न. वि. वि.

' माणूस ' चा दिवाळी अंक थोडा उशीरा वाचला. खूपच आवडला. या अंकातील विनय हर्डीकर यांचा ' आम्ही आणि बदमाष काळ ' हा लेख अत्यंत सडेतोड व नेटका वाटला.

या लेखावरील प्रभाकर पाध्ये व श्री. ना. पेंडसे यांच्या प्रतिक्रियाही वाचल्या. श्री. ना. पेंडसे यांची प्रतिक्रिया हर्डीकरांएवढीच सडेतोड व प्रामाणिक वाटली.

११ जानेवारी १९७८

**प्रा. झुंबरलाल कांबळे**
( डॉ. आंबेडकर कॉलेज, महाड )

वरील स्वरूपाचे अभिप्राय अनेकांनी आजवर लेखी व तोंडी स्वरूपात कळविले. काही अभिप्राय ' माणूस ' अंकात प्रसिद्धही झाले.

मराठीत आजवर प्रसिद्ध झालेल्या आणीबाणीसंबंधीच्या लिखाणात बहुतेकांच्या मते सर्वोत्कृष्ट ठरलेला हा ' बदमाष काळाचा शोध ' संपूर्णपणे पुस्तकरूपात आता लवकरच प्रकाशित होत आहे.


# जनांचा प्रवाहो चालिला

## लेखक : विनय हर्डीकर

**' राजहंस प्रकाशन ' चे आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण प्रकाशन**

MANOOS ( Marathi Weekly ) 75 Paise Regd. No. PNC-68

औषधी द्रव्य
तुमचे व्यक्तिमत्त्व आणि कार्यक्षमता
यांचा खून करते–
आणि ते तुमचाही सर्वनाश करते–निश्चित



या पासून दूर रहा–

एल्. एस्. डी. • ॲम्फेटॅमिन्स
• बार्बिच्युरेटस् वगैरे

77/528